वर्षाची अगाऊ रु० ९ डाक हशील ०।२
सहामाही " २ " ०।८
सालअखेर " ७ " १।८
किरकोळ अंकास.......................०।४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०।६
दुसरे खेपेस ........०।१

Per annum in arrears 7 ,,1Rs. 8 as
Six monthly..........3 " 8 as
Single copy..............................4as

Advertisements
Below 10 lines...2R
per line over10...4as
Repetition per line3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXV AKOLA MONDAY 6 APRIL 1891 NO 13

वर्ष २५ अकोला सोमवार तारीख ६ माहे एप्रील सन १८९१ इ० अंक १३

**HEALTHWEALTH &PROSPERITY.**

जी. बी. नाईक कंपनीच्या

**विजेच्या आंगठ्या व पुतळ्या.**

खात्रीचा माल घेऊन अनुभव पहा. खोटा माल घेऊन फसूं नका.

**५०,००० वर विकल्या.**

रक्त हें मनुष्याचें जीवित्व आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे.

जग प्रसिद्ध आहे कीं, सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोगावर करितात. ज्याच्या आंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यास विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला आहे व त्यापासून पुष्कळ आजारी मनुष्यें औषधोपचारा शिवाय बरीं झालीं आहेत. याविषयीं हजारों डाक्टर साक्ष देतील.

रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग ह्या लहानशा ब्याटरी पासून बरे होतात. संधिवायु, शिरांगत वायु, ठणका, छातींतील दुःख, कंबरेंतील दुःख, व्रण किंवा सूज, भोंवर, पुरुषत्व भंग, अशक्तपणा, स्त्रियांचे रोग, काळजाचें दर्द, ज्वर, अर्धशिशी, मूत्रशयांतील रोग, मस्तक शूळ, मूळव्याध आणखी इतर होणारे रोग देखील निवारण केले जातात. अशी गुणकारी, सर्व रोग शमन करणारी, आंगावर सुशोभित दिसणारी ही सर्वांनजवळ असावी हें योग्य आहे. ही ब्याटरी एकदां घेतली ह्मणजे आयुष्य भरची खटपट चुकली.

गुणाबद्दल हजारों दाखले मिळाले आहेत व मिळत आहेत.

किंमत दर पितळी आंगठीस रु० १॥ व पुतळीस १।, चांदीचे आंगठीस रु.३ व पुतळीस रु. २, सोन्याचे आंगठीस रु० २० व पुतळीस रु० २२; एक डझन घेणारास एक नग जास्त मिळेल. एक पासून सहा नग पर्यंत ट० हा० सहा आणे. रोख दाम आल्यास किंवा व्हा० पे० नें मागविल्यास पाठवूं. आंगठी करितां बोटाचें माप पाठवा. विशेष माहिती पत्रका करितां अर्धा आणा पाठवावा.

विकत मिळण्याचा पत्ताः—मुंबईः—भायखळा ढावणी समोर व पुणेंः— बुधवार पेठ चौकांत.

जी. बी. नाईक आणि कंपनी. ढावणी समोर, भायखळा, मुंबई. १

लोहभस्म केशर मिश्र व **बलभीम पाक.** पुष्कळ वनस्पती मिश्रित.

एकदम १०० तोळे पाक घेणारांस १। रु. ची विजेची पुतळी फुकट मिळेल.

शिफारसपत्र—आपल्याकडून मागविलेला बलभीम पाक मी माझ्या स्त्रियास दिला. त्याची पांडुरोगासारखी भावना होऊन दिवसोंदिवस शरीर प्रकृति तेजहीन आणि अशक्त होत चालली होती, ती आपल्या पाक सेवनानें बरीच सुधारली. पुनः ८० तोळे पाक जरूर पाठवावा. रघुनाथ अनंत जमादार गदग रे० स्टेशन.

हा पाक लोकांच्या अनुभवास आलेला व थोर लोकांनीं पसंत केलेला व खाण्याला गोड असून (५१६ जिल्ह्यांतील लोकांस गुण आला आहे.) याच्या सेवनानें पुढें लिहिलेले गुण मनुष्याला प्राप्त होतात. नपुंसकत्वा सारखी नेबळाई नाहीशी होते. आंगावर चांगली कांती येते. शरीर पुष्ट होतें. धातु वाढते स्वमावस्था व लघवींतून धातु जाण्याची बंद होते. योग्य वेळीं धातु लवकर पतन होत नाहीं. कामेच्छा वाढते. शक्ति येते भूक चांगली लागते. शौचाला साफ होतें. डोळ्यांस थंडावा येऊन दृष्टि तीव्र होते. परम्याचा जुनाट रोग जातो. पित्त, आम्लपित्त, दमा, हगवण, आंव हे विकार जातात. स्त्रिया, पुरुष व मुलें यांनीं हा पाक घेण्यास फारच नामी आहे. कितीही तोळ्यांचे ३ डबे घेणारांस त्या मासल्याचा एकडबा बक्षीस देऊं. दर २० तोळ्यांच्या ड. २॥ रु०, ४० तो० ड० ४॥ रु०, ८० तो० ड० ८ रु०, १०० तोळ्यांच्या डब्यास ९॥ रु०, टपाल व हंगी खर्च निराळा पडेल.

शिफारसपत्र—आह्मी तिघा मित्रांनीं मिळून आपला बलभीम पाक २७० तोळे घेतला आणि त्यापासून यावा तसा गुणही आला आह्मी चांगल्या मार्गी पैशाचा व्यय केला त्याबद्दल आनंद होत आहे. पाक गुणकारी आहे यांत शंका नाहीं. हणमंत कल्याणराव, हणमंत कृष्ण वि० व राघवेंद्र व्यंकटेश बिडीकार०

पत्ता—लक्ष्मण आप्पाजी पुरंत धारवाडवृत्त ऑफीस. मु० धारवाड.

वऱ्हाडसमाचार

मिती फाल्गुन वद्य १२ शके १८१२

### लोकमत वृद्धि

( ११ वे अंकावरून पुढें चालूं )

सुधारकांचीं पत्रें देखील पार्लमेंटांत फाडून पाहात असत, व त्यांत सरकार विरुद्ध कांहीं दिसलें कीं त्यास पकडून आणून मोकदमा केल्या वाचून राहात नसत. एखाद्या ग्रंथ कर्त्यावर राजानुग्रह नसला तर त्याचा ग्रंथ कधीं ही प्रसिद्धीस यावयाचा नाहीं इत्यादि तऱ्हेनें लोक मत स्वातंत्र्य कमी करण्याचा सरकारनें अतिशयच यत्न केला असा जरी भयंकर खटाटोप सरकारनें आरंभिला तथापि लोकांनीं बिलकुल दाद दिली नाहीं. शाबास त्या दमदार व दृढनिश्चयी इंग्रज लोकांची आमच्या सारखे लोक असते तर केव्हांच त्यांचा धुळदाण झाली असती त्यांनीं मोठ्या शहाण पणानें व नेटानें आपल्या प्रबळ प्रतिपक्षा विरुद्ध टिकाव धरला. त्यांनीं सरकारचा व प्रधान मंडळीचा असा क्रम पाहिल्या बरोबर ज्या सदोष शासन पद्धतिमुळें त्यांचेवर घोर प्रसंग गुदरले त्या पद्धतींत सुधारणा करण्याचा यत्न चालविला. पुष्कळ लोक सुशिक्षित झाले असल्या मुळें त्यांना राज्य प्रकरणीं प्रश्न बरेच समजू लागले. त्यांना वाटलें कीं ज्या पद्धतीनें हीं प्रधान मंडळी निवडली जाते त्या पद्धतींतच फेरफार केला ह्मणजे आपली कार्य सिद्धि होईल. तेव्हां पासून त्यांनीं हें संपादण्या करितां परिश्रम चालविले व त्यांत त्यांना यश ही लवकरच मिळालें हळूं हळूं नवीन मंडळी अधिकारापन्न झाल्यामुळें व त्यांच्या मतांत फेरफार पडल्यामुळें राज्य शासन पद्धतींत पुष्कळ फेरफार घडून आला. प्रथम फॉक्स, अर्सकिन, व लार्ड कॅमडन् या सद्गृहस्थांनीं लायबेल ॲक्ट् मध्यें सुधारणा करून सरकारची बेकायदेशीर व अनिवार सत्ता कमी केली व लोकांना आपलीं मतें बेधडक प्रसिद्ध करण्याचें स्वातंत्र्य मिळवून दिलें. तसेंच पूर्वी जुरर्स लोक जे केवळ नामधारी होते व ज्याचे सर्व काम न्यायाधीशच करी त्यांना अधिक स्वतंत्र मिळालें व त्यांची आणि न्यायाधिशाचे कामाची नीट वाटणी केली. राजाला ही वाटलें कीं लोकांना या वेळेस आपण जर मत स्वातंत्र्य दिलें नाहीं. तर फारच अनर्थ घडून येतील. ह्मणून पार्लमेंटमध्यें जीं भाषणें होत त्यांचा गोषवारा नांवासह प्रसिद्ध करण्याची मोकळीक राजानें वर्तमानपत्रकर्त्यांना दिली. असे हळूहळू हक इंग्लंडांतील पत्रकर्त्यांस मिळत गेल्यामुळें त्यांना पूर्वी पेक्षां अधिक धाडस आलें.

त्यामुळें त्यांचें इतकें वजन वाढलें कीं प्रधान मंडळीला त्यांकडे दुर्लक्ष्य करतां येईना. एखादा अन्याय अगर अहितावह गोष्ट प्रधान मंडळीचे हातून घडली कीं लागलेंच वर्तमानपत्रांतून त्याची चर्चा सुरू होई. व तेणेंकरून मंत्र्यांवर अतिशयच वचक बसे. लॉर्डन्यूट साहेबावर तर इतकी चर्चा झाली कीं अखेरीस त्यांना पोबारा करावा लागला. इ० १७३३ मध्यें वाल्पोल साहेबांनीं जो देशांत उत्पन्न होणाऱ्या मालावर कर बसविला तो लोकांना न पसंत पडल्या मुळें त्यांना काढून घ्यावा लागला. हल्लीं इंग्लंडमध्यें वर्तमानपत्रांचें किती प्राबल्य आहे हें सर्वांस मशहूर आहेच.

राष्ट्रांत लोकमताचा प्रसार व वजन वाढविणारें दुसरें साधन झटलें ह्मणजे सार्वजनिक सभा व मंडळ्या. देशांत कोणत्याही प्रकारची चळवळ सुरू करण्यास हीं द्वारें अत्यंत उपयुक्त आहेत. एकत्र जमून कोणकोणत्या उपायांनीं आपली सुधारणा होईल आपणावरचा जुलूम कमी होऊन आपलें ऐहिक सुखाची कशी वृद्धि होईल, कोणत्या सामाजिक सुधारणा आपण प्रथम केल्या पाहिजेत वगैरे प्रश्नांची वाटाघाट सर्व एकत्र जमल्या वाचून उत्तम प्रकारें होत नाहीं. यंदा कदाचित ठिकठिकाणीं चर्चा झाली तथापि सर्वत्रांचे एक मत होण्याचा संभव कमी असतो. जगाच्या रहाटी वरून आपणांस असें आढळतें कीं सर्वांचें एकमत झाल्यावांचून कोणत्याही सुधारणेचें पाऊल पुढें पडत नाहीं. व यदा कदाचित् पडलें तरी सर्वांचें पाठबळ पुरेसें नसल्यामुळें अल्पकालांत तीं ऱ्हास पावतें शिवाय सरकारापाशीं आपली दाद लावून हक संपादून घ्यावयाचे असतील तर एकमत अवश्य पाहिजे. प्रजेला हक देण्याविषयीं सरकारचा अगोदरच फार उल्हास असतो. त्यांतून थोडेसें क्षुल्लक कारण आढळलें कीं पुरे. कांहीं थोडे लोक प्रतिकूल असले कीं ते लागलींच सांगतात कीं सर्वांचें एकमत नाहीं करितां तुमचें ह्मणणें आह्मांस पसंत पडत नाहीं. सारांश सार्वजनिक कृत्या करितां सार्वजनिक सभा व मंडळ्या असणें फार जरूर आहे, हें इंग्रज लोकांचें मनांत पूर्णपणें अठराव्या शतकांच्या शेवटीं बिंबून गेलें. ह्या लोकांचें अंगीं मोठा तारीफ करण्या सारखा हा गुण आहे कीं कोणत्याही गोष्टी विषयीं त्यांचें एकदां निश्चित मत झालें व अमूक केलें असतां अमूक परिणाम होणारच असा पूर्ण ग्रह झाला कीं आपल्या मता प्रमाणें यश येई पर्यंत त्याचा पिच्छा सोडीत नाहींत. त्यांत मग कितीही अडचणी आल्या तरी त्यांनां ते दाद देत नाहींत. तेव्हां पासून त्यांनीं गांवों गांवीं, खेडों पाडीं, शहरों शहरीं

सार्वजनिक सभा स्थापन करण्या विषयीं अतोनात परिश्रम केले. इ. स. १७८० सालीं अशा गोष्ट घडून आली कीं यॉर्कशायर व दुसऱ्या तेवीस काऊंटीज मधील मिरासदार लोकांनीं आपणास कोण कोणत्या खर्चाच्या बाबींत काटकसर करतां येईल व पार्लमेंट मध्यें मेंबर निवडण्याचे नियमांत कोण कोणते फेरफार होणें इष्ट आहे या विषयीं विचार करण्या करितां सभा भरविली इतर लोकांनीं ही त्यांचें अनुकरण करून ठिकठिकाणीं सभा भरविल्या. या ठिकाणीं फॉक्स सारख्या मोठमोठ्या वक्त्यांचीं भाषणें झालीं. अखेरीस त्यांनीं आपल्या ज्या कांहीं मागण्या होत्या त्या एका अर्जांत नमुद करून तो अर्ज पार्लमेंटमध्यें पाठविला. एवढेंच करून ते स्वस्थ बसले नाहींत. त्या सर्व सभांनीं आपसांत पत्र व्यवहार सुरूं ठेवला व आपली दाद सरकारचे जवळ लागेतों पर्यंत एकसारखी चळवळ सुरूं ठेवण्या विषयीं हस्तें परहस्तें जी त्यांनीं खटपट केली तिचें वर्णव करतांच येत नाहीं. ठिकठिकाणचे लोकांनीं लंडन येथें आपले मुखत्यार पाठविले. त्या मुखत्यारांस पिट सारख्या वजनदार पुरुषाचें पाठबळ मिळाल्यावर त्यांना अधिकच उमेद आली. शिवाय त्यांनीं हें जें कृत्य आरंभिलें तें केवळ एक दोन अगर चार पुरस्कर्त्यांनीं भर दिली ह्मणून नव्हते. राज्याकारभारांत पुष्कळ अंधेर व जुलूम आहे व त्यामुळें आपल्या अडचणी दुर होत नाहींत व गरीब गुरीबांस कष्ट करून ही पोटभर अन्न खाण्यास मिळत नाहीं याचा अनुभव त्यांनीं पुर्णपणें घेऊन चुकला होता.

पुणे येथें डेकन कालेजांतील विद्यार्थ्यांनीं गेल्या शनवारीं व सोमवारीं रात्रौ शूद्रक कृत मृच्छकटिक नाटकाचा दोन हप्त्यानीं प्रयोग करून दाखविला. मृच्छकटिक नाटकाचे एकंदर दहा अंक आहेत. पहिल्या दिवशीं ह्मणजे शनवारी रात्रीं अंक १ ते ४ पर्यंतचा प्रयोग करून दाखविला व दुसरे दिवशीं ह्मणजे सोमवारी रात्रौ ५ ते १० अंक करण्यांत आले. नाटकाचा प्रयोग संस्कृतांत असून संस्कृतज्ञ लोकच कायते आले होते. यामुळें नाटक गृहांत गर्दी प्रेक्षकांची विशेष जमली नव्हती. नाटकांतील मुख्य पात्रें~ वसंतसेना चारुदत्त, मैत्रय, शर्विलक, शेनवीट, शकार यांनीं आपलीं कामें फारच सफाईनें बजाविलीं. अभिनय, अंगविक्षेप काम करण्याची शैली, बोलण्याची धाटणी वगैरे लागणाऱ्या अवश्य गोष्टी त्याचा हा प्रथमच प्रयत्न होता त्या मानानें पाहतां फारच उत्तम प्रकारें वठल्या गेल्या पात्रांची भाषणें अस्खलित झालीं. गाण्यावर विशेष मेहेनत घेतली होती. वसंतसेनेची गाण्या संबंधी उणीव बऱ्याच अंशी तिचे अभिनयानें भरून आली असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. विद्यार्थ्यांनीं वेळांत वेळ काढून व आपला नित्य क्रम ह्मणजे अभ्यास ही संभाळून व निदान दोन महिने अव्याहत श्रम करून वरील नाटकाचा प्रयोग करून दाखविला ही गोष्ट त्यांस विशेष अभिनंदनीय आहे. हाच क्रम प्रतिवर्षी डेकन कालेजांतील विद्यार्थी चालवितील अशी आह्मी आशा करितों. यांत त्यांचा कांहीं वेळ खर्च होईल हा गोष्ट खरी आहे तरी या पासून त्याचा तोटा न होतां झाला तर थोडा बहुत फायदाच होईल. अभिनय सभा धीटपणा वगैरे गुण त्यांस अशा प्रसंगानें यत्किंचीत् तरी अवगत करून घेता येतील.

अलिकडे जे आपणास वारंवार असे ऐकूं येते कीं विद्यार्थ्यांनां त्यांचे अभ्यासांत चूर होउन गेल्यामुळें इकडे तिकडे हात घालण्यास मुळींच वेळ फांवत नाहीं तरी डेकन कालेजचे विद्यार्थ्यांनीं वरील उक्तींत कितपत तथ्य आहे या गोष्टीची थोडीशी चुणूक दाखविली.

ह्या मंडळीस जे नाटकाचे प्रयोगा पासून उत्पन्न झालें तें डेकन कालेजांतील बोट क्लबांस देण्याचा त्यांचा इरादा आहे ही फार स्तुत्य गोष्ट आहे.

मणिपूरचे महाराज शूरचंद्र आपल्या सापत्न चौथा बंधूच्या जाचाला व फंद फितुरीला त्रासून गेल्या सप्टेंबरांत कलकत्यास इंग्लिशांच्या आश्रयास येऊन राहिले. त्या नंतर महाराजांच्या ह्मणण्या वरून आमच्या सरकारच्या मध्यस्तीस आरंभ होऊन प्रस्तुत सर्व मणिपूरभर बंडावा झाला आहे आणि इंग्लिश पलटणीची पांचावर धारण बसली आहे तरी थोडक्यांतच मणिपुरास या बद्दल जबरदस्त प्रायःश्चित भोगावें लागेल.

वऱ्हाडांतील हायस्कूल माजी विद्यार्थी समाज रिती प्रमाणें गेल्या शिमग्याच्या सणांत उमरावतीस रा. रा. शंकर गोविंद वकील यांच्या अध्यक्षते खालीं भरला होता. हे दोन दिवस मोठ्या मौजेचे करमणूकींत गेले. समाजास मंडळी दिडशेवर आली होती. बुलढाणा किंवा परतवाडा या ठिकाणीं ही समाज एखादे सालीं भरावा अशा विषयीं दोन सूचना होत्या त्याचा पुढील वर्षी निकाल होईल. अशा समाजाची उपयुक्तता वारंवार सांगण्याची जरूर नाहीं त्या प्रमाणें परस्पर मित्र मंडळींची आगत स्वागत पूर्वक सलोख्यानें भाषणें व खेळ झाले हें ही लिहिण्यास नको. यंदाच्या समारंभांत सभासदांच्या हिता हिताच्या गोष्टी विषयीं विचार करून निरनिराळे उपाय योजण्याचे बहुमतानें ठरविलें आहे. समाजास मदत पुष्कळ जणांची असावी तशी नाहीं कां कीं चंदना सारखे अंग झिजविणारे गृहस्थ फार विरळा सांपडतात. या समयीं मुख्यत्वें करून रा. रा. वामन नारायण बापट ए० अ० कमिशनर यांचे चिरंजिव राजश्री गोपाळराव यांनीं समाजा निमित्त फार श्रम घेतले व जमलेल्या पाहुण्यांचा बातबेत चांगला राखिला हें सांगितल्या वाचून आम्हांस समाधान वाटत नाहीं.

वरील समाजाच्या वेळीं पूर्व संकेता प्रमाणें वऱ्हाड वक्तृत्वोत्तेजक सभा भरून बक्षीसें वाटण्यांत आलीं. या सभे विषयीं मंडळींचा अनास्था पाहून फार खेद वाटतो आणि अशा व्यवस्थेनें ही सभा लयास जाऊन तिजविषयीं तसदी घेण्याच्या 'चोर' प्रसंग शिकलेल्या मंडळींवर बहुतक येणार नाहीं असें प्रमोदसिंधु कर्त्यांनीं मोठ्या दुःखानें लिहिलें आहे. सर्वजण समजूतदार आहेत तेव्हां आम्हीं ही आणखी निराळा बोध करावा अशांतला कांहीं पर्याय नाहीं.

The Berar Samachar

MONDAY, APRIL 6, 1891.

We recommend to our readers the letter from our occasional correspondent at Poona. It deals with the step which the Poona oppositionists of the 'Age of Consent' bill has taken to demand justice for the cause of the people which they represent. The Hindu Patriot has advocated moderation in agitation and we think that the agitation has not exceeded the constitutional limits excepting the rare cases where men were exasperiated to an action of unwise temper in the midst of exceptional circumstances. The English Parliament is the final bar before which we shall claim every thing at stake in the legislation of highly centralized govt. which is eminently irresponsible and non representative in character. The Manchester Guardian has tried to chalk out the line of legislative work in India when it observes that 'in making political concession we run no risk of arraying the feelings of the people against : quite the country? We shall express next time our views in regard to the next programme of the oppositionists but before we do that we urgently request those who are scrupulously anxious to know 'who will be the oppositionists' M. P. in the Parliament' to give a careful perusal to the views of a distinguished gentleman in England which we cull from the columns of the new daily 'Amrita Bazar Patrika.'

"I, too, believe that the Age of Consent Bill is a mistake. It is worse than a mistake; it is a grievous wrong. The outcry against the Hindu marriage system is based on ignorance and prejudice. English people, of course, think their own customs the best in the world; and there are many—probably most of the *recently* educated Indians, who think that everything English is good, because it is English. But in sober truth the English marriage customs are open to the gravest objections. They are founded on no philosophical, natural, or even common sense principle; they are a mere hap-hazard jumble of accidentol circumstances, and are the direct causes of the worst social evils which afflict England. English people do not see the folly and mischiefs of their own marriage customs, beoause they are used to the muddle; but any Indian would be a fool who would change his own well-ordered system for the woman-degrading practices which prevail here.

Another thing has not been noticed, *viz*, that Hindu law is a perfect system— one part cannot be interfered without disarranging the whole. The marriage system may, or may not, be the best marriage system which could be invented, but it must be judged as part of the social polity of a vast nation. If one part be disarranged another part will give way, and fresh alterations will be again and again required. This is the unfortunate result of "Liberal" principles. The mistake of the reformers is an enthusiastic desire to reform suddenly anything which looks like an abuse. If wrong is any how made to appear, prudence is at once scouted: the wrong has to go, heedless as to whether haste may not produce more evil than the wrong to be removed. For the last fifty years these thoughtless, but good hearted, impulses have held sway in England; and they have caused a countless succession of changes in the constant effort to mend what has been put wrong by previous meddling. It never occurs to these really good people that, had they simply left things alone there would have been no occasion for all the excited amendments of recent times."

(Communicated)

'The seals of success dazzle their eyes They leave the truth and by their falsehood rise,'

These remarks are not intended as any disparagement to the private characters or virtues of those of the aping legislationists who have without foreseeing the consequences brought no small calamity on this country by splitting it into two hostile parties by every perfidy and indiscretion. Among these misguided few there are some whose talent is greatly and well cultivated but these people have erred. The impatience of a rival, the intolerant spirit, the irritability which is brooked only by those who seek to rise to eminence through self praise and flattery and many such faults among most of those who sought to be legislationists when need was none have, we fear, tended to expose the hidden causes which for so long a period have been barriers to concord and unity. Mr. or some so called or self elected Prof:— who began by abusing his betters was in his turn abused. The truth is now universally acknowledged that the legislationists of course most of them however deified by the people committed gross enormities without impunity.

Some advocate the doctrine of forget & forgive to the ante-legislationists who have indeed diffused lustre and glory around their country by their moderation, zeal, integrity and rectitude of purpose. We are afraid for the infant Congress. We indeed tremble for every progress till the wounds inflicted are healed to scars. If these were blunders of judgment they could have been corrected ere long. But the question assumed a party aspect. The legislationists of course could never have found a better opportunity to make an exhibition of their true nature long and ingeniously disguised! We pity the "Hindu" asking us who we are that question the leadership of men like the Hon. K. T. Telang and the Hon. Rao Bahadur Ranade. Is the writer of that unsophistical dull spirit as to demand "who these we are." These people are learned. But how often have the learned brought calamities on their country by trying to apply their half acquired theories to an imperfect and comparatively ignorant state of society? These people are mere theorists. They are not the leaders of the masses. Those alone are our leaders who can both represent our wishes and imperciptibly elevate us. Cobden, Hampden were leaders of men. Bnt certainly those, to whom to shock and wound those whom they pretend to lead but on whom they mean to experiment their theories perhaps with the best motives by means never foul, are no leaders. They would have often desisted for the sake of the people unable to make such rapid strides. They are leaders so far as Strafford or Land were.

Perseverence is an index of genius. The agitation has indeed taken a decisive turn. We wish demonstrations be sent over to England. Several of the Vernacular papers incapable of grasping any thing but thinking themselves all and all have only been at a loss to find out a champion for the ante legislationists.

It is but natural that such people having no pretentions to erudition and reading contemporary newspapers should find themselves unable to read the riddle that was framed by the Sudharak. In the Parliament there are many to ask the India office why the Bill was passed through so much opposition. But these people must be ignorant of these facts being solely guided by a reckless and onesided organ whose reformation is nothing else but destruction. Does truth involve doubts for a champion?

If a false Native like Malbari could appeal to the senses of the people, and impose upon them, will sincerity of pur pose, zeal awakened by a prospect of subversion of the Proclamation, and funds spontaneously paid fail to impress our benign rulers in England with truth? The protest must be raised. Every effort must be made to get the law revoked. Nothing will indicate the national love for the principle of Laissez Faire than at least a desperate tena city of purpose displayed on this occasion. This time or never. Awake there fore all our generous countrymen and give your mite to the associations of Bengal or Poona. It is to the advantage of the anglo Indian papers to protest against the schemes proposed. Reptile writers and false leaders tremble for their meretricious hold; their selfish ness urges them to discourage the mas ses. What will undaunted perseverence not gain of course the last stake being reserved?

But side by side with your noble and generous attempt let your political con vention not suffer. Think legislationists or not, your own selves striving to unite together in one purpose and one inter est. Keep social differences and political discords quite distinct from each other.

To
The Editor, Berar Samachar Akola
Sir,

Although the Scoblean Bill is passed into law, yet there is time and constitutional method for the oppositionists to raise their voice of protest against it and consequently a grand open air meeting was held here last Sunday on the open Maidan before the Shanwar Wada. A large Mandap capable of holding some 5000 persons was erected for the time. The capacity of the Mandap was tried to its utmost extent and consequently a large crowd of the sympathisers of the meeting had to stand outside the Mandap. The total aggregate of those present there may come up in round number to 10,000. Great enthusiasm was to be seen in those present there Hindoos as well as Mohamedans since a common danger had drawn them together and compelled them to act in concert. Thus the meet ing obtained a degree of unity and consequently of interest.

At 5 P. M. the proceedings of the meeting commenced. The striking characteristic of the meeting was order, regularity and peace. Mr. Vishnu Sham Rao or otherwise styled Bandu Nana Ranade was unanimously voted to the chair. Raosaheb Namjoshi explained in brief why it was necessary for them to agitate the question in England, notwithstanding the bill was passed into law by the Government of India. He said since the passing of the law was due to the incessant and untirsing efforts of Mr. Malabari Shet in England it was but fair that the oppositionsists also should have their say in England and should educate the people of England with regard to the actual state of affairs here. The Government of India, he observed, dependent upon the Govt. in England is not always free to act for itself and many a time it is compelled to adopt measures owing to the pressure that is put upon it from above. He further remarked, since they were a thoroughly loyal subject it was but con sistent with their loyalty that they should by constitutional methods endea vour to bring themselves out clear of the ignominious and shameful charges which the supporters of the bill had in view to impute to them.

He was fowllowed by Mr. Bal Gangadhur Tilak who in a very able and impressive speech criticized shortly the viceregal speech and also the speeches of the members of the legislative council at the time of the passing of the bill. He said the Viceroy in his speech at the time of the introduction of the bill into the council had given out that the bill was brought before the council on the express supposition that it did not interfere with Hindoo religion but in his speech when the bill was passed in to law he not only made no reference to what he had said in his former speech but brought in the Queen's Proclamation of 1858 as authority to justify the measure although it was interfering with Hindoo religion. By straining and twisting the meaning of the Proclamation the Viceroy, he observed endea voured to bring additional strength to the party supporting the bill. He further remarked to get a clear elucidation of the meaning of the Proclamation they ought to appeal to the Queen the origin from which it sprang up. He then explained how the members of the legislative council did away with the modifications which were suggested by the supporters of the bill. He further referred to the speech of the Lt. Gov. of Bengal in which he had declared his intention to pass a departmental circular that no case under the newly passed law was to be admitted by any magistrate unless the party complaining was a competent one since the law made no definite mention as to who should be complainants in such a case. It was very strange that the Lt. Gov. did not insist on the necessity of inserting some such definite thing in the law. Thus it appeared, observed Mr. Tilak, that the law was passed simply through *persistence*. The Viceroy while holding the balance between evil arising from police oppression and good resulting from the working of the law declared in favour of the latter as pre-eminently predominating over the former. He then dwelt on the non-representative character of the councils and illustrated by the Hon. Rao Bahadoor Nulkar's conduct who flatly refused to place before the council the protest of the people of Sholapur the utter uselessness of the present non representative legislative councils.

Mr Vaidya then read the memerial addressed to the Right Honourable mem bers of the House of Commons which was unanimously adopted.

Mr. Ram Narayen a well-known mer chant in a very able and impressive speech dwelt on the necessity of raising a permanent fund to be able to continue the agitation. By personally setting a very noble example and placing before the president of the meeting his subscription towards the fund he induced his professional brothers and others in the meeting to follow the noble prece dent set by himself. In one word the effect of his speech was electrical. A Mohamedan gentleman supported Mr. Ram Narayan and explained how the new law interfered with the Mohamedan religion and in order to have the law rescinded he in a very vigorous and stirring appeal to the audience impress ed upon it the necessity of a hearty union and co-operation of the Hindoos and Mohamedans.

In the meantime subscriptions began to flow in stream from all sides. Over 1500 Rs. were subscribed to on the spot. Some of the subscribers paid down their subscription then and there. Had the proceeding of the meeting been extended over a couple of hours more no less than some 3000 or 4000 Rs. would have been collected on the spot. Subscriptions from high jahagirdars and Sardars, Vakils down to Culies, Hamals &c who eat their bread in the sweat of their brows were voluntarily tendered in and accepted. This was in short a miniature of the subscription collection scene witnessed at the sitting of the National Congress held at Bombay in 1889. A Committee was then appointed consisting of some 5 or 6 members to acknowledge subscriptions which might come in afterwards.

With a hearty vote of thanks to the Chairman the meeting wrs dissolved in the defeaning cheers of the audience.

Poona has set a very noble example of self-sacrifice for good cause and may it be followed in several places.

Yours
"B"

Poona
1st April 1891.

## वऱ्हाड.

उन्हाळा हळूं हळूं प्रखर होत चालला आहे व शंभरावर कांहीं थोड्या अंशा पर्यंत पारा चढत असतो. वसंतऋतूच्या आरंभा पूर्वी इतका उष्मा विशेष तापदायक वाटतो परंतु हा फरक अधिक महिन्या मुळें भासत आहे तेव्हां त्या विषयीं भिती बाळगण्याचें कांहीं कारण नाहीं. मध्यंतरी गेल्या सोमवारीं व मंगळवारीं वळीव पाऊसा सारख्या कांहीं जोरदार सरी आल्या व त्यांत बर्फाचे लहान लहान कण ही दृष्टीस पडले. हवामान एकं दरीनें चांगलें आहे व रोगराई म्हणण्या सारखी नाहीं.

खामगांव कोडताचे जज्ज लेफ्ट. डेव्हिस साहेब यांस अडीच महिन्यांची रजा मिळा ली आहे. त्या रजेंत अकोल्याचे एक्स्ट्रा असि० कमिशनर मि० माणिकशा रतनजी दस्तूर हे साहेब मनकूरांचें काम पाहण्यास खामगांवास रवाना झाले.

येथील स्मालकाज कोडताचे न्यायाधिशाचें काम रा. रा. गणेश नापूजी एक्स्ट्रा असि० कमिशनर यांजकडे सोपविलें असून खामगांवचे तहशिलदार रा. रा. एकनाथ मोरेश्वर यांस अकोल्यास अक्टींग एक्स्ट्रा असि० कमिशनर नेमिलें आहे.

खावगांवच्या रिकाम्या तहशिलदारीवर रा. रा. विठूजी नारायण हुजूर नाझर यांस येथून पाठीवणार आहेत.

रा. रा. अंताजी नारायण वैंचलेकर कारंज्याच्या शाळेचे हेडमास्तर रजेवरून परत आपल्या कामावर दाखल झाले आणि त्या मुळें त्यांच्या रजेंतील बदल्या रद्द होऊन बदलेले शिक्षक पूर्व ठिकाणीं मावारे न.तील.

येथील ट्रेनिंग कॉलेजचे व्हाइस प्रिन्सिपाल रा. रा. भास्कर लक्ष्मण अभ्यंकर हे बऱ्याच मोठ्या रजेवर गेल्या मुळें त्या जागीं मलकापूराहून रा. रा. दामोदर कृष्ण ठिळक यांस येथें ट्रेनिंगांत बदललें आहे अणि रा. रा सितारामपंत चितळे यांस उमरावतीहून मलकापूरच्या जागीं नेमिलें.

येत्या रविवारीं अकोला जिल्ह्यांतील लोकांची राष्ट्राय सभे निमित्त सभा भरणार आहे. ज्यांस साधेल त्यांनीं सवड करून सभेस स्वतां हजर होण्याची मेहरबानी करावी.

मि. हेअर साहेब डायरेक्टर आफ लॅंडे रिकार्डस यांनीं कांहीं महिन्यांची रजा घेतली आहे.

चिखलेचे तहशीलदार रा. रा. यशवंत महादेव यांना तीन महिन्यांची हक्काची रजा मिळाली आहे.

येत्या राष्ट्राय सभे निमित्त स्वागत कमिटीची नेमणूक होण्या साठीं काल सकाळीं नागपुरास जाहिर सभा भरणार होती त्या समयीं त्या कमिटींत दोनशे वजनदार गृहस्थ नेमावयाचे असून त्यांत प्रमोदसिंधूच्या म्हणण्या प्रमाणें ८० गृहस्थ वऱ्हाडांतील निवडणार आहेत.

रा. रा. विष्णु हरी जोशी व रा. रा. कृष्णाजी महादेव हे अनुक्रमें मलकापुरास व अकोटास अक्टींग तहशिलदारीचें काम पहात आहेत त्यांस त्याच ठिकाणीं कायमचे तहशिलदार नमण्यांत आलें आहे हें कळविण्यास संतोष वाटतो.

चालूं महिन्याच्या पहिले तारखे पासून तीन महिने पर्यंत मि. ओ. व्ही. बोझानक्वेट सी. एस् यांस हक्काची रजा मिळाल्या कारणानें लेफ्टनन्ट प्रिचर्ड साहेब यांस रेसिडेंटचे दुय्यम असिस्टंट आणि वऱ्हाडचे असिस्टंट सेक्रेटरी नेमण्यांत आलें आहे.

क्याप्टन फागन साहेब यांस रेसिडेंट साहेबांच्या हाता खालीं तिसरे वर्गाचे पोलिटकल असिस्टंट नेमिलें आहे.

रा. रा. रामचंद्र अनाजी पन्हाळकर असि० मास्तर उमरावती हायस्कूल यांनीं प्रकृति अद्याप नादुरस्त असल्या मुळें चार महिन्यांची रजा वाढविण्या साठीं पुन्हा लिहिलें आहे.

उमरावती क्यांप मुनसिपालिटीच्या हद्दींतील टाऊन फंड बंद करून त्या ऐवजीं निराळी घरपट्टी बसविली जावी ह्मणून अधिशान रेसिडेंट साहेबांनीं फर्मावलें आहे.


## जाहिरात.

एलिचपूर येथें होणारा सर्व प्रकारचा माल कोणास पाहिजे असल्यास आह्मांस कळवावें. माफक कमिशन घेऊन पाठवीत जाऊं. विशेष माहिती करितां टिकीट पाठवा.

जी. डी. काविटकर
मर्चंट आणि कमिशनर एजंट
शहर एलिचपूर.


नोटस

रा. रा. नारायणदास दयाराम दुकान हाते वहिवाटदार रामप्रताप पोखरदास राहणार हाते. यास खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतकी तुम्ही आमची जागा वर्षे १४ चवदाच्या करारानें घेतली. त्याचा तपशील ज्या जागेंत तुह्मी दुकानदारी करित आहां ती जागा बांधून सदरील १४वर्षे उपभोग घेऊन नंतर इमल्या सुद्धां जागा आमची आह्मास तुह्मी द्यावी अशा करारानें जागा आह्मी तुह्मास दिली व या प्रमाणें सदर्हू मुदतही जाहाली आतां करारा प्रमाणें ही नोटीस पावल्या पासून १९ दिवसांचे आंत आमची जागा इमल्या सुद्धां ताब्यांत द्यावी असें केलें नाहीं तर रीती प्रमाणें काम चालवून अखेर निकाल होई पर्यंत व या नोटिशीचा खर्च वगैरे सर्व तुह्मां पासून भरून घेतले जाईल ह्मणून दिल्ही नोटीस सही तारीख ४।४।९१ इसवी.

सही
यशवंतराव गोविंदराव देशमुख हाते
दस्तुर सोनाजी माधवजी देश
मुख

## वर्तमानसार.

रशियन राजकुमारानें हिंदुस्थानांत फिरत असल्याचा मजकूर त्यानें जी नोंद आपल्या रोजनिशींत वेळोवेळीं करून ठेविली त्याच्या आधारें आपल्यास वडिलास पत्रद्वारा कांहीं गोष्टी कळविल्या त्यांतील पुढील भाग येणे प्रमाणें:

इंग्लिश लोकांनीं हिंदुस्थानची एकंदर माहिती करून घेण्यासाठीं अनेक प्रकारचीं खातीं उभारलीं आहेत परंतु त्यांस मिळावी तशी खरी माहिती समजत नसल्यामुळें जिकडे पहावें तिकडें अन्यायाचें छत ताणलेलें दृष्टीस पडतें.

इंग्लिश राज्यापेक्षां निजाम हैद्राबाद, बडोदें, म्हैसूर वगैरे संस्थानामधील प्रजा सुखी असून राज्यकारभार सुरळीत चालल्याचें अनुभवास येते

इंग्लिशराज्यांतील प्रजा संतुष्ट नाहीं असें मी खात्रीपूर्वक सांगून तें सिद्ध करून देण्यास तयार आहे.

गावखात्यांतील सनातन कामगार. देशमुख, देशपांडे, पाटील कुळकर्णी, चौगुले यांची उत्पन्नें हिसकाऊन घेऊन त्यांस रोजमुऱ्यावर ठेवल्यामुळें राजावर असावें तितकें प्रेम दिसत नाहीं. त्या लोकांस थोडी लालूच दाखविल्या बरोबर ते फितुरी बनतात. खेडेगांवीं पाटील कुळकर्णी लोकांवर रयतेचा भरंवसा असून त्यांजकडे केव्हां तरी पेशवाई प्रमाणें मालकी येईल अशी आशा असल्यामुळें लोक त्यांच्या आज्ञेत वागतात.

सरकारानें बलुत्याची रीत बंद केली सबब चोऱ्या वगैरेचे गुन्हे अधिक होऊं लागले. कारण रखवालदारावर झाल्या चोरीची जबाबदारी मुळींच नाहीं. ती रीत संस्थानांत कायम असल्या मुळें त्यांच्या हद्दींत चोरी वगैरेचा गुन्हा बनत नाहीं. कदाचित् बनला तर नुकसानीचे वळ तर रखवालदारापासून घेता येते.

इंग्रजलोक हिंदूवर बिलकूल भरवंसा ठेवीत नाहींत. त्यांत मुख्य ब्राह्मणजात.

हिंदुस्थानांत हत्यार चालविता येत नाहीं अशी जात विरळा. ब्राह्मण धनुर्विद्येचे गुरु ह्मणवितात. क्षत्रियाचा तर बाणाच आहे वैश्य आपल्या व्यापारांत हरकत होऊं नये इतक्या पुरती शास्त्रविद्या जाणतात शूद्रलोक गोफण तिरकामठा, यांजवर आपल्या शेतकीचें रक्षण करतात. परंतु अलीकडे रयतेची इंग्रज सरकारानें चटसारीं हत्यारें हिसकाऊन घेतलीं आहेत. हत्याराशिवाय लोक आपल्या जिवाचें रक्षण कसें करतात हें पाहण्यास हिंदुस्थान शिवाय जगांत दुसऱ्या ठिकाणीं मिळावयाचें नाहीं.

शिक्षण प्रकार अती वाढला परंतु व्यवहार शिक्षण हिंदुस्थानांत कोठेंच दिसून येत नाहीं शाळेंत गेलें तर तोंड पसरून लांब हेलावर कविता ह्मणताना आढळत; बाकी टेकनिकल एज्युकेशनचें वारें सुद्धां नाहीं

प्राप्तीवरील करामुळें बहुतेक नोकरलोक नाखुष झाले असून पलटणचे लोकसुद्धां दिलगीर आहेत. त्यांची पहिल्यासारखी उमेद दिसत नाहीं करबसविण्यास खर्च दाखवितात. प्रत्येक खात्यामधून खर्च तोडण्याचा झपाटा चालला आहे.

लोकांत हालचाल कसली आहे तें नित्य समजून घेण्यासाठीं पोलिसमार्फत डिटेक्टिव दरएक शहरामधून नेमले आहत ते मोठाले समाज, मेळे आणि सार्वजनिक सभा या मध्यें कोण कसली चर्चा करती याची माहिती घेऊन ती अधिकाऱ्यांच्या कानावर घालतात. मला वाटतें माझ्या बरोबर जे युरोपियन अंमलदार राहात ते नित्य माझे चालचलणुकीची हाकीगत लिहून वरीष्ठ सरकारांत पाठवीत. मला माझे लोकाशीं बोलण्याची वेळ त्या लोकांचे लक्ष चुकवून फार थोडा सापडे.

शिकंदर बादशाहा; वाशिंगटन व ड्यूक आफ वेलिंगटन यांनीं लिहून ठेवल्याप्रमाणें इंग्लिशांचें वर्तन हिंदुस्थानांत दृष्टीस पडत नसून प्रसंगाचे वेळीं गरीब हिंदूस मृत्युमुखीं उभे केल्याचीं उदाहरणें अधिक सापडतात. हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास उपलब्ध नसून लोकांनीं आपल्याकडे असलेल्या उत्पन्नाच्या पुराव्यासाठीं जित्रापलीकडे सरकारच हुकूम राखले होते ते इनामकमिशन खतें काढून त्या चौकशींत मागवून घेऊन नाहींसें केलें व थोडे दिवसांनीं ते जाळून ही टाकले ह्मणतात राजे रजवाडे, किंवा संस्थानिक किंवा उमरावदार यांच्या दरम्यान सरकारास वेळोवेळां उपयोगांत आणतां येतील असें कागदपत्र पुणें व मुंबई मध्यें सरकारानें फार जपून ठेविले आहेत.

पुण्यांत पेशवे दफ्तराची इमारत नवीन बांधून त्यांत पाहाण्यासारखे दाखले रक्षणांत ठेवले आहेत, मला ते पहाण्याची सवड झाली नाहीं.

आपली जात, धर्म आणि राष्ट्र याचा अभ्युदय कसा होईल या विचारांत सर्व हिंदुस्थान गुंग होऊन गेले आहे. इकडे पुष्कळ लोक रशियाचा राजा पहाण्यास उत्कंठा पूर्वक वाट पहात बसल्याचें दिसून आलें.

हिंदुस्थानांतील लोकांचें कल्याण अंतःकरणासून करावें अशी इंग्लिश लोकांच्या इच्छेची प्रसिद्धी ऐकीवांत येत असे तें वळण बदलून होईल त्या घाटानें जातीची संजोगणी चालू आहे.

हिंदुस्थानातील लोकांस जातीच्या पेहेरव्याचा तिटकारा येऊन इंग्लिश पोशाखाची आवड अधिक उपजत चालली.

घरांत, दारात आणि सहजवृत्या दरबारांत इंग्लिश भाषेनें व्यवहार करण्यांत थोरवी वाढू लागली.

जर्मनीचा राजा रशियामध्यें आपलें पाऊल कसें खंबीर होईल या बाबदींत विचार करीत नसेल असें वाटत नाहीं.

इंग्लिश मिळाल्या सरहद्दींत राजनिष्ठा आणि ऐक्याच्या पेढ्या काढीत नाहीं त्यामुळें अन्योन्य प्रेमाचा दुष्काळ पडू पाहात आहे.

तेलाचा बोळा फिरविलेल्या कागदावरील वचनलेख कांहीं वेळ राहू शकतो परंतु इंग्लिश लोकांकडून मिळालेलें सुख टिकू शकत नाहीं अशी प्रजेची ओरड आहे.

इकडे उठण्या बसण्यापर्यंत कायदे कौन्सिल्यानें ठरविले आहेत, पण त्यांत एक ही कायदा असा नाहीं कीं, ज्यांत अर्थाची स्पष्टता योग्य प्रकारें करता येईल. तसल्या कायद्याचा अंमल २० वर्षाचा सिव्हिलियन कामदार निर्धोक चालवितो.

आपले तिकडे अनुभवशीर मनुष्यावेगळें घर प्रपंच सुद्धा चालू शकत नाहीं, मग लहान वयाची सिव्हिलीयन बाळें परिक्षा देऊन राज्य कारभार चालवितात हा इकडील चमत्कार पहाण्याजोगा आहे. कायद्याचा अर्थ न समजतां कायदेशीर काम करण्याची ऐट दाखविणारे कळप हिंदुस्थानावेगळे पाहाण्यास दुसरें ठिकाण नाहीं.

हिंदू प्रजेची राज्यनीति फारच सात्विक तत्वानें मढविली असून सेव्यसेवकभाव संबंधानें गाठविला आहे. मुसलमानाची राज्यनीति अंमलाच्या आणि शक्तीच्या बळावर जांगडून ती शास्त्राच्या द्वारें प्रगट केली आहे. ती माहित म्याक्समुलर साहेबांच्या पुस्तकांत चांगली आढळून येणार आहे.

वेद ब्राह्मणांचें धर्मशास्त्र आहे.

त्रिपिटका बुद्धलोकांचे आणि कुराण मुसलमानांचें धर्मशास्त्र आहे.

हिंदु मूर्तिपूजक आहेत. ते आपआपल्या देवतांच्या सुंदर मूर्ती रम्य देवालयांत बसवून पुराणिकांकडून त्या मूर्तीचे भक्तलोकांस चरित्र श्रुत करण्याची पद्धत इकडे अधिक दृष्टीस पडते.

हिंदूत "भाव" हाच देव मानतात त्यांच्या आत्म्याला जोवर दुःख दिलें नाहीं तोंवर ते धरलेला अभिमान प्राणत्याग झाला तरी सोडीत नाहींत.

हल्लीं इंग्रजसरकारानें गोरख पंथी शिपाई मुद्दाम पलटणींत ठेवले त्याचें कारण तेंच आहे. या लोकांस जेवणाला कांदा आणि निजेला धोंडा पुरतो त्यांची बडदास्त सोळजरप्रमाणें ठेवणें न पडता लढाईच्या कामांत शत्रूला ते हटविण्याची कुवत दाखवितात.

ज्या हिंदुस्थानावर इंग्लिश राज्य करीत आहेत त्यांस हिंदू अगर मुसलमान लोकांची खरी स्थिती अथवा खरी प्रपंच व्यवस्था माहीत असल्याचा घमेंड फुकट आहे जर त्यांस खऱ्या स्थितीची ओळख झाली असती तर सर्व इलाख्यांतील लोक जिगजिग झालेले दृष्टीस पडले नसते.

इकडे ज्या ज्या मुलखांत मी हिंडलो त्या त्या मुलखांत रशियाच्या झाराचें नांव ठाऊक नाहीं असा प्राणी विरळा. पहाणाराची मजवर प्रेम दृष्टि असावी अशी भासली, मला लोकांनीं ओळखावें ह्मणून मी आपला अवडता रशियन पोषाखच करीत असे, मजभोंताली युरोपियन लोकांचा गराडा हामेशा असे; पण तो आदरातिथ्यासाठीं ह्मणत. आपली भाषा या देशांत मुळींच अवगत नाहीं; पण ज्या ज्या शाळेंत मी गेलो तेथें कोठे ही रशियाचा इतिहास काळजीपूर्वक शिकवून जॉग्रफीची माहिती करून दिली असें स्थळ आढळलें नाहीं पण युरोपियन लोकांस रशियन भाषा शिकण्याबद्दल बढती मिळून त्यांची आज काल वाहवा होते असें दिसून आलें.

इकडील शहरें पाहाण्यासारखीं आहेत. रचना सुबक लोकवस्ती मोठी असून प्रजा अगदीं निरुद्योगी अशी थोडी.

बंगाल फ्रांसाच्या तोडीचा आहे.

---


## सचित्रक्याटलाग.



आर. डी. कानिटकर
आणि कंपनी
मुंबई गिरगांव ह्याचा नवीन तऱ्हेचा इंग्रजी किंवा मराठी अर्ध्या आण्याचें तिकिट पाठविल्यास मिळेल.



वामन गोपाळ यांचा अनेक औषधमिश्रित

## सार्सापरिला

हा सार्सापरिला अनेक रोगांवर गुणावह असून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणकारी आहे. उपदंशजन्य विकार, (गरमी) व तिजपासून होणारे पक्षघातादि भयंकर रोग, संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हाता पायांच्या तळव्यांवर व सर्व शरिरावर काळे डाग पडणें. संधी दुखणें कळा लागणें, सूज येणें वगैरे सर्व संधिगत वायुंवर तसेंच कोणत्याही प्रकारचे त्वचेचे रोग, जसें सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज, गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातापायांची आग होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे. सारांश उपदंशजन्यापासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दूषित झाले असल्यास ते शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखे दुसरे औषधच नाहीं. दर बाटलीस किंमत १। रुपया, पोस्टेज ४ आणे; उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक धातु व रक्तवर्धक मिश्र फास्फरसाच्या

## गोळ्या.

यापासून अतिशय विषयोपभोग, नित्य धातुस्राव यानें झालेली शरिराची क्षिणता जाऊन अशक्तता, अग्निमांद्य, जीर्णज्वर, नपुंसकत्व इत्यादि विकार तावडतोब नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरिरांतील चैतन्याचा व वृद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जाकंद (मेंदु) व मज्जातंतु यांच्या मंद झालेल्या सर्व क्रियांचे पुनःरुज्जीवन होतें. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायुची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणास जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यानें पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत. किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे. बंगी व पोस्ट मिळून एकापासून कितीही बाटल्या घेतल्या तरी ६ आणे पडतील.

पांढरे केस काळे भोर होण्याचा

## कलप

हा कलप प्रत्येक पंधरा दिवसांनीं एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. यानें सफेद करड्या व पिंगट रंगाचे केस काळेभोर होऊन त्यास तेज येते. किंमत १ रुपया पोस्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधासोबत मिळेल पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्ही. छत्रे याचे दवाखान्यांत वरील सर्व औषधे मिळतील.

आमचा पत्ता—नव्या ठाकुरद्वारा समोर


---


☞ हें पत्र अकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची अगाऊ रु० ९ डाक हशील ०।२
सहामाही " ३ " ०।८
साळअखेर " ७ " १।८
किरकोळ अंकास............०।४

नोटीशीबद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।१।६
दुसरे खेपेस ......०।१

Per annum in advance 6 Postage 1-2-0
Per annum in arrears 7 ,,1Rs. 8 as
Six monthly..........3 " 8 as
Single copy.......................4as

Advertisements
Below 10 lines...2R
per line over10...4as
Repetition per line3as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXV AKOLA MONDAY 13 APRIL 1891 NO 14

वर्ष २५ अकोला सोमवार तारीख १३ माहे एप्रिल सन १८९१ इ० अंक १४

**HEALTHWEALTH &PROSPERITY.**

जी. बी. नाईक कंपनीच्या

## विजेच्या आंगठया व पुतळया.

खात्रीचा माल घेऊन अनुभव पहा.

खोटा माल घेऊन फसूं नका.

५०००० वर विकल्या.

रक्त हें मनुष्याचें जीवित्व आहे व विद्युत्ता रक्ताचें जीवन आहे.

जग प्रसिद्ध आहे कीं, सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोगावर करितात. ज्याच्या आंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यास विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला आहे व त्यापासून पुष्कळ आजारी मनुष्यें औषधोपचारा शिवाय बरीं झालीं आहेत. याविषयीं हजारों डाक्टर साक्ष देतील.

रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग ह्या लहानशा व्यापारी पासून बरे होतात. संधिवायु, शिरांगत वायु, ठणका, हाडांतील दुःख, कंबरेंतील दुःख, वण किंवा सूज, भोंवळ, पुरुषत्व भंग, अशक्तपणा, स्त्रियांचे रोग, काळजाचें दर्द, ज्वर, अर्धशिशी, मूत्राशयांतील रोग, मस्तक शूळ, मूळव्याध आणखी इतर होणारे रोग देखील निवारण केले जातात. अशी गुणकारी, सर्व रोग शमन करणारी, आंगावर सुशोभित दिसणारी ही सर्वांजवळ असावी हें योग्य आहे. ही व्यापारी एकदां घेतली ह्मणजे आयुष्य भरची खटपट चुकली.

गुणाबद्दल हजारों दाखले मिळाले आहेत व मिळत आहेत.

किंमत दर विजेची आंगठीस रु० १॥ व पुतळीस १।, चांदीचे आंगठीस रु.३ व पुतळीस रु. ५, सोन्याचे आंगठीस रु० २० व पुतळीस रु० २२; एक डझन घेणारास एक नग जास्त मिळेल. एक पासून सहा नग पर्यंत ट० हा० सहा आणे. रोख दाम आल्यास किंवा व्ह्या० पे० नें मागविल्यास पाठवूं. आंगठी करितां बोटाचें माप पाठवा. विशेष माहितीचे पत्रका करितां अर्धा आणा पाठवावा.

विकत मिळण्याचा पत्ता:—मुंबई:—भायखळा दावणी समोर व पुणें:— बुधवार पेठ चौकांत.

जी. बी. नाईक आणि कंपनी. दावणी समोर, भायखळा, मुंबई. ६

कोहभस्म केशर मिश्र व **बलभीम पाक.** पुष्कळ वनस्पती मिश्रित.

एकदम १०० तोळे पाक घेणारांस १। रु. ची विजेची पुतळी फुकट मिळेल.

शिफारसपत्र—आपल्याकडून मागविलेला बलभीम पाक मी माझ्या स्त्रयास दिला. त्याची पांडुरोगासारखी भावना होऊन दिवसोंदिवस शरीर प्रकृति तेजहीन आणि अशक्त होत चालली होती, ती आपल्या पाक सेवनानें बरीच सुधारली. पुनः ८० तोळे पाक जरूर पाठवावा. रघुनाथ अनंत जमादार गदग रे० स्टेशन.

हा पाक लोकांच्या अनुभवास आलेला व थोर लोकांनीं पसंत केलेला व खाण्याला गोड असून (५१६ जिल्ह्यांतील लोकांस गुण आला आहे.) याच्या सेवनानें पुढें लिहिलेले गुण मनुष्याला प्राप्त होतात. नपुंसकत्व सारखी नेबळाई नाहींशी होते. आंगावर चांगली कांती येते. शरीर पुष्ट होतें धातु वाढते स्वप्नावस्था व लघवींतून धातु जाण्याची बंद होते. योग्य वेळीं धातु लवकर पतन होत नाहीं. कामेच्छा वाढते. शक्ति येते. भूक चांगली लागते. शौचाला साफ होतें. डोळ्यांस थंडावा येऊन दृष्टि तीव्र होते. परम्याचा जुनाट रोग जातो. पित्त, आम्लपित्त, दमा, हगवण, आंव हे विकार जातात. स्त्रिया, पुरुष व मुलें यांनीं हा पाक घेण्यास फारच नामी आहे. कितीहि तोळ्यांचे ३ डबे घेणारांस त्या मासल्याचा एकडबा बक्षीस देऊं. दर २० तोळ्यांच्या ड. २॥ रु०, ४० तो० ड० ४॥। रु०, ८० तो० ड० ८ रु०, १०० तोळ्यांच्या डब्यास ९॥ रु०, टपाल व बंगोलचे निराळा पडेल.

शिफारसपत्र—आह्मी तिघा मित्रांनीं मिळून आपला बळभीम पाक २७० तोळे घेतला आणि त्यापासून यावा तसा गुणही आला आह्मी चांगल्या मार्गी पैशाचा व्यय केला त्याबद्दल आनंद होत आहे. पाक गुणकारी आहे यांत शंका नाहीं. हणमंत कल्याणराव, हणमंत कृष्ण चि० व राघवेंद्र व्यंकटेश बिडीकार.

पत्ता— लक्ष्मण आप्पाजी पुरंत धारवाडपूल ऑफीस. मु० धारवाड.

वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र शुद्ध ५ शके १८१३

## ब्रिटिश सरकारचें राज्य.

ब्रिटिश सरकारचे अंमला पासून पुष्कळ व हित झालें आहे. आगगाड्या, तारायंत्रें वगैरे झाल्यानें लोकांचे आपल्या आपल्यांत दळण वळण वाढलें; व्यापार वाढला; लोक शिकूं लागले; व शाहाणे सुर्ते झाले. या प्रमाणें पुष्कळच प्रकारचे फायदे झाले. परंतु परकीयांचे अंमला पासून देशाला जे तोटे व्हावयाचे त्यांत कांहीं एक कमी झाले नाहीं. हिंदुस्थान देशांतील पैसा जाऊन हिंदुस्थान दश कंगाल बनत चालला आहे लोकांना खाण्या पिण्याला लागतो तितका पैसा न मिळाल्या मुळें लोकांची अन्नान दशा झाली आहे व होत आहे. या गोष्टी एकदम समजण्यांत येत नाहींत. परंतु सरकारी प्रसिद्ध झालेल्या आंकड्या वरून हें स्पष्ट होत आहे दादाभाई नवरोजी वगैरे लोकांनीं कांहीं कपाळी ओरड केली तरी आमचे लोक अजून सावध होत नाहींत. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या 'इंडिया' चे अंकांत या संबंधानें आंकडे प्रसिद्ध झाले आहेत. त्या वरून या वरील गोष्टी पूर्ण पणें नजरेस येतात. हे आंकडे 'इंडिया आफिस' चे कागदा वरून घेतले असल्या मुळें त्यांत कमजास्त असण्याचा संभव नाहीं. दर माणसीं दरवर्षी सरासरीनें खालीं लिहिल्या प्रमाणें उत्पन्न पडतें. इंग्लंडांत दरमाणसी ४२० रु. आस्ट्रेलिआंत ४३० रु. कानड्यांत जवळ जवळ २७० रु; हालंडांत २६० रु. फ्रान्सांत जवळ जवळ तितकच; डेन्मार्कांत २३० रु; बेलजमांत २२० रु; जर्मनींत सुमारें १८२ रु; स्वीडनांत १८० रु. आस्ट्रिआंत १६२ रु; स्विट्झरलंडांत १६० रु. पोर्तुगालांत १४० रु. स्पेन व नार्वे या मध्यें १३० रु ग्रीस व इटलि या मध्यें ११० पासून ११६ पर्यंत; रशियांत ११० रु. व हिंदुस्थानांत २०. या वरून हें सिद्ध आहे कीं सर्व युरोप खंडांत जो अतिशय गरीब देश रशिया तो सुद्धां हिंदुस्थाना पेक्षां पांच पटीनें श्रीमंत आहे. या बरोबर हें ही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं वर लिहिलेल्या देशांतील पैसे देशांतले देशांतच राहतात; परंतु हिंदुस्थानांतील पैसे सर्व बाहेर जात आहेत. व त्या प्रमाणेंच हिंदुस्थानांतील व्यापार पुष्कळ परदेशीय लोकांचे हातीं असल्यामुळें व्यापारांतील नफा व कमाई परदेशीयांचे भक्ष्यस्थानीं पडते.

सर डेव्हिड बार्बर यांचें मतानें हिंदुस्थानांत दरवर्षीं शेतकीचें उत्पन्न ३२,५०,००००० रु. आहे व त्याचे निमें इतर बाबींचें आहे; ह्मणजे दर वर्षीं सुमारें ४,७५,००,००० रु. उत्पन्न होतें. या रीतीनें दर माणसीं सुमारें २७ रुपये उत्पन्न पडतें. दादाभाई नवरोजी यांचे मतानें २० रुपयावर प्रत्येक माणसांचें उत्पन्न जात नाहीं. हें उत्पन्न प्रत्येक भागावर खालीं लिहिल्या प्रमाणें आहे. मध्यप्रदेशांत प्रत्येक इसमास सुमारें ३० $\frac{1}{2}$ रु. पडतात. मुंबई इलाख्यांत तितकेंच मद्रास इलाख्यांत दर माणसीं २६ रु. पडतात. पंजाबामध्यें २५ $\frac{1}{2}$ बंगाल्यांत २० $\frac{1}{2}$ वायव्यप्रांत व अयोध्या या प्रांतांतून दर इसमास २० $\frac{1}{5}$ उत्पन्न पडतें. एकंदरींत सरासरीनें हिंदुस्थानांत दर इसमास २७ रुपये प्रमाणें उत्पन्न पडतें. आतां पंजाबामध्यें खाणें पिणें, कपडा लत्ता वगैरे मिळून ३४ रु. खर्च लागतो व त्या पेक्षां अधिक उष्ण प्रांतांतून सुमारें ३० रुपये खर्च लागतो. यावरून हिंदुस्थानांतील लोकांना खाण्यापिण्याला जो खर्च लागतो त्या पेक्षां उत्पन्न कमी आहे. इंग्लंडांत प्रत्येक मनुष्याचा खर्च जाऊन सुमार ४० रु. बचत राहते व हिंदुस्थानांत लोकांनां पोटभर खावयास ही मिळत नाहीं. यांत आणखी हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं इंग्लंडांतील खर्च इकडील खर्चापेक्षां अधिक आहे; व असें असूनही त्यांची शिलक पडते. यावरून असा सहजच प्रश्न निघेल कीं हिंदुस्थानांत लोकांचें होतें तरी काय? याला उत्तर इतकेंच कीं लोकांना पोटभर मिळत नाहीं व पुष्कळ लोक परलोकाचा मार्ग लवकरच धरतातत. इंग्लंडांत प्रत्येक मनुष्य ३९ वर्षे वाचतो व हिंदुस्थानांत प्रत्येक मनुष्य फक्त २३ वर्षे वाचतो. हा आंकडा १८८१ मधील मनुष्य गणतीचे वेळीं काढलेला आहे. या वरून हिंदुस्थानांत प्रत्येक माणसामागें जो तोटा येतो तो कसा भरून येतो हें दिसून येईल.

सन १८८६, १८८७, १८८८ यावर्षी हिंदुस्थानांत दुष्काळ वगैरे फारसा नव्हता व इतर गोष्टी संबंधानें हीं वर्षे बरीं गेलीं. या तीन वर्षांत मिळून एकंदर १,५३,१२,४६९ इतके लोक मेले. सन १८७७-७८-७९ यां वर्षीं हिंदुस्थानांत बऱ्याच प्रांतांतून दुष्काळ पडले होते. परंतु या तिन्ही वर्षांत मिळून सारे १, ४९,१८,७१३ इतके लोक मेले; या वरून वर्षानुवर्ष लोक अधिक अन्नान्त दशेला येऊन पोहोचूं लागले आहेत हें सिद्ध होतें. दिवसेंदिवस तापानें लोक जास्त मरताहेत; व याचें कारण अन्नपाणी, कपडालत्ता

चा याची कमताई हें होय. जरूरीचे पदार्थ पुरे न मिळाल्यामुळें ताप आला ह्मणजे लोकांची गच्छंन्तीचीपाळी येते. सुमार १०० वर्षांत सुधारलेल्या देशांत लढायामुळें जितके लोक मरत नाहींत त्यापेक्षां जास्त लोक १० वर्षांत हिंदुस्थानांत नुसत्या तापानें मृत्युमुखांत जाऊन पडलीं. व ताप ह्मणजे अन्नपाण्याची कमताई याचेच दुसरें नांव आहे. या बरोबर मिठाच्या कराचा विचार केला पाहिजे. १८०० सालीं जितक्या मिठाला ९ आणे पडत होते तितक्याच मिठाला आज २ रुपये ११ आणे पडतात. ही मद्रासची गोष्ट झाली मुंबई इलाख्याचे संबंधानें जितक्या मिठाला आज २ रु. ८ आणे पडतात तितक्याच मिठाला पूर्वी ८ आणे पडत होते. मिठ हे खाण्याचा एक मुख्य जिन्नस आहे. व त्याची लहान थोरास सर्वांसच गरज आहे. त्याची जर अशी स्थिती तर इतर गोष्टीचे काय ! ! इंग्लंडांत प्रत्येक मनुष्याला २० शेर मिठ नुसतें खाण्यास लागतें; व इतर दुसऱ्या गोष्टींना मिळून माणसीं तिकडे ३६ शेर मीठ लागतें हिंदुस्थानांत मिठ तर जास्त लागावें कारण इकडे मांस मच्छर खाण्याचा फार प्रचार नाहीं पण हिंदुस्थानांत माणसी सारे ९ शेरच मीठ पडतें. इतक्या थोडक्या मीठावर लोकांना निर्वाह करावाच लागतो. मीठ कमी खाल्यानें रक्तपीती आदि करून रोग उत्पन्न होतात. इंग्लंडांत मीठाचा थोडा कमी खर होऊं लागला तो रक्त पीतीचा जास्त जास्त प्रसार होऊं लागला. आमचे सरकार तर आमच्या अशा वस्तूंवर जबर कर ठेवितें; अशा सार्व जनिक व सर्वांचे हिताचे इतकेंच नव्हे; सर्वांना अगदीं अगदीं जरूरीचे गोष्टीकडे दुर्लक्ष करतें इतकेंच नाहीं; तर लोकानां त्यांचे मागण्याला 'आतां सध्या सवड नाहीं' अशा प्रकारच्या वाटाण्याच्या अक्षता मिळून स्वस्थ बसावें लागतें याचें प्रत्यक्ष उदाहरण मुंबईहून आनरेबल मि. फेरोजशाहा मेथी यांनीं कांग्रेसचे तर्फेनें लिहिलेल्या खलित्याचे उत्तर होय. आमचे सुधारकांना सामाजिक सुधारणे शिवाय दुसरें कांहीं दिसत नाहीं; मग लोक मरोत किंवा तरोत; परंतु आमचें दैव असें विलक्षण आहे कीं आम्हांला या सुधारकां वाचून सरकारकडे जाण्याला वाटच नाहीं; कारण सुधारकाखेरीज बाकीचे लोकांवर सरकारचा विश्वासच पटत नाहीं. आमचे सुधारकांचे लक्षांत अशा गोष्टी येतच नाहींत. व हेही उघड उघड आहे कारण त्यांना ह्या गोष्टींचा अनुभव येत नाहीं—कारण 'हे मिठ तोडणें जाणार आहे' वगैरे लिहिण्या पुढें सुधारक पढ्यतच नाहींत. ह्याच्या करितां समाजाचे विरुद्ध जाऊन जर सुधारकांनीं अकटोविकट असे प्रयत्न केले तर अशा सर्व लोकांचें हितांचें व जरूराचें काम ते कां हातीं घेत नाहींत हें कळत नाहीं! असो.

हिंदुस्थानांत शेतकीचें साऱ्याचे उत्पन्न सुमार दोन कोट रुपये आहे. व कराचें उत्पन्न सुमार ४॥ कोट रुपये आहेत. या पैकीं स्टेट आफ सेक्रेटरीनें फक्त इंग्लंडांत हिंदुस्थाना करितां २,३४,९०,००० रुपये खर्च केले. अशा रीतीनें खर्च होत आहे व अशाच रीतीनें आणखी कांहीं दिवस जर चाललें तर हिंदुस्थानचे खोट कल्याण खरोखर लवकरच होईल यांत कांहीं संशय नाहीं.

या वरील गोष्टीवरून काय काय गोष्टी सिद्ध होतात हें फोडून सांगण्याची गरज नाहीं. सर्व गोष्टी उघड उघडच आहेत. समाजाचे पुढाऱ्यांनीं व शाहणे लोकानीं यांविषयीं पुढें येऊन या दारिद्र्या पासुन प्रतिकार होऊन लोक सुखी होतील अशा रीतीच्या गोष्टी कराव्यात इतकेंच सांगून आह्मी हा लेख संपवितों.

---

संमति वयाचा कायद्या संबंधानें आपली किर्ती अजरामर करून आनरेबल स्कोबल साहेब विलायतेस रवाना झालें आणि त्यांच्या स्थानीं सर अलेक्झांडर एवर्ड मिलर के. टी क्यु. सी. या साहेबांची नेमणूक झाल्या प्रमाणें त्यांनीं आपल्या कामास गेल्या बुधवार पासून सुरुवात केली.

---

राष्ट्रीय सभेची मुख्य ओरड काय आहे कीं इंडियांतील कायदे कौसिलांतून लोकनियुक्त सभासद नाहींत आणि त्या मुळें भलभलत्या जुलमी कायद्यानें सत्वस्थ प्रजेचा विनाकारण छळ व नागवणूक होत आहे तर कांहीं एका विशिष्ट पद्धतीस अनुसरून लोकनियुक्त सभासद निवडल्यास थोड्या बहुत उपायांनीं लोकांस आपापले अभिप्राय सरकार पुढें मांडून त्या प्रमाणें नवीन कायदे कानू पसार करण्या साठीं निराळा अधिकार देण्याचा समय देशकालवर्तमाना प्रमाणें येऊन चुकला आहे तेव्हां सरकारनें हिंदुस्थानांतील सुशिक्षित व लोकमतानुसारी गृहस्थांच्या मागण्याचा विचार लांबणीवर टाकतां कामा नये. या मागणाचा अर्थ असा निघतो कीं सरकारनें संमती बिला बंसंधानें जो लोकमताचा पाडाव केला आहे तो इंग्लिश राजनीतीच्या मूळतत्वास प्रतिरोधी असून राष्ट्रीय सभेला आपल्या म्हणण्याची परिस्फूटता फार जोरदार रीतीनें व लोकांस राष्ट्रीय सभेची अत्यावश्यकता फार योग्य तऱ्हेनें दर्शवितां येईल अशा मतलबानें येत्या नागपूरच्या बैठकीस करणें जरूरयांत आहे. संमति बिला विषयीं आपापल्या मधील अभिप्राय कांहीं असले तरी तात्विक दृष्ट्या राष्ट्रीय सभेच्या आधारस्तंभ व भक्कम अशा सूचनेच ह्मणजे लोकमतास झुगारण्याचा प्रयत्न सरकारनें केला ही गोष्ट फार सुमार होय. राष्ट्रीय सभेनें आपल्या ह्मणण्यांत विसंगतता नाहीं व आपले विचार लोकमतसंवादी आहेत असें प्रतिपादलें आहे तेव्हा कायदेवाल्या व बेकायदेवाल्या मंडळींनीं सलोख्यानें व सामोपचारानें योग्य विचार करून येत्या डिसेंबरांत वरील प्रश्नाचा व्यवस्थशीर उलगडा करावा.

राजकीय प्रकरणांत मात्र राष्ट्रीय सभेचा विचार ग्राह्य आहे तरी सामाजिक गोष्टींत राजकीय विचार घुसडून असल्या पायाशुद्ध संस्थेचा लय होऊं नये असा कित्येक विद्वानांचा उदार विचार आहे आणि तो आह्मांस अक्षरशः मान्य आहे. परंतु ज्या अर्थी संमती कायद्यानें आपल्या देशांत विलक्षण दुफळी झाली आहे त्या अर्थीं मोघमांत असें तरी राष्ट्रीय सभेच्य ठरावांत विघ न होणें अवश्यक आहे कीं कायदे कौंसिलांतून लोकविचारास मानमान्यता मिळावी ती फक्त राजकीय प्रकरणांत मिळावी बाकी सामाजिक विषयांत कायदेकानू नवीन करण्याचा प्रसंग आल्यास असल्या लोकमतप्रवर्तक कौंसिलदारापासून सरकारनें सल्ला मसलत घेऊं नये. किंवा निदान सामाजिक उन्नतीच्या बाबतींत सरकार मार्फत होण्याची अलाहिदा निराळी पद्धत सरकारांतून वेळोवेळ जाहीर केली जावी. या विषया संबधानें आमचा हा अभिप्राय वऱ्हांडांतील वर्तमानपत्रामध्यें भिन्न समजुतीचा आहे तेव्हां प्रस्तुत प्रसंगीं त्याचें दिग्दर्शन करून आह्मी या ह्मणण्याचें नीटपणें मनन करून आपापलीं मतें लोकांस कळविण्याविषयीं आमच्या छोटेखानी प्रांतांतील सुज्ञ वाचकांस विज्ञप्ति करितों.

---

## अवश्यमेव पाहिजे

राष्ट्रीय सभा नको म्हणतात असा कांहीं कावेबाज कायदेवाल्यांनीं बेकायदेवाल्या वर आरोप लादण्याचा प्रयत्न चालवून तेणें करून विरुद्ध पक्षाच्या म्हणण्यांत मातबरी नाहीं किंवा त्यांचें म्हणणें म्हणजे पामरजनांचा पोरकट हितवाद आहे असें प्रतिपादण्याचा मोठा जोरदार थाट घातला आहे. परंतु अशा प्रयत्ना संबंधानें आह्मी फार दिलगीर आहों इतकें नव्हे तर अशा प्रकारचा विचार द्रोहजनक असून लोकांस गैरमार्गी दाखविण्या सारखा आहे असें आम्ही समजतो. संमति बिला पासून जी भयंकर दुही माजून फाटाफूट झाली आहे त्या मुळें राष्ट्रीय सभेस विघ्नें येतील किंबहुना तिचा लय होण्यास अशी निराळी कारणसामुग्री होत आहे असें जे प्रतिपादतात त्यांच्या कडून फार मोठी चूक होत आहे व अशी भोपळ्या एवढी चूक कायम राहूं दिल्यानें मात्र अनर्थ कारक कारणें उद्भवतात असा आमचा समज आहे. जर एकाद्या वेळीं राष्ट्रीय सभेची आवश्यकता दिसून आली असले तर संमति बिलांत झालेल्या लोकापमाना बद्दल निदान जबाब घेण्यासाठीं त्या सभेची फार जरी आवश्यकता आहे; तेव्हां सर्व लोकांनीं प्रस्तुत प्रसंगीं सर्वेपरी आपसांतील मतभेद बाजूस करून मनोभावानें राष्ट्रीय सभेचा परमोत्कर्ष करण्यास काडीमात्र अनमान करूं नये अशी आमची सर्व नेटिवास हात जोडून प्रार्थना आहे. बिला संबधानें लोकमतास पादाक्रांत करून त्याची पायमल्ली करून सोडली आहे तरी अनंत कालावर दृष्टी देऊन लोकमताचा विजय होईलच होईल अशा बळकट आशेनें राष्ट्रीय सभेसारख्या संस्थेचें अभीष्ट चिंतिलें पाहिजे आणि हा सिद्धान्त लोकसत्तात्मकराज्यपद्धतीच्या इतिहासा वासून जगास विदित आहे तेव्हां सूज्ञ लोक हा सर्व व्यापी सिद्धान्त शिकण्याचा वृथा शीण घेतल्याचें अपयश आपल्या शिरीं वाहणार नाहींत अशी आमची पूर्ण खातरी आहे.

---

संमति बिल पसार झालें तेव्हां वास्तविक सुधारणा किंवा निदान तदनुसार वर्तन अंमलांत आणण्यासाठी लोकांनीं बलवत्तर खबरदारी घेतली पाहिजे. ह्या त्या बिल विषयक गोष्टी लोकरूढ व्हाव्या ह्मणून आमच्या मुनसिपालिटीनें ही यथाशक्ति आरंभ केला आहे. जनन मरणांचे तक्ते विशेष पद्धतवार करून नोंद बुकें व्यवस्थशीर भरण्या संबंधानें कडेकोट तयारी केली आहे तेव्हां वयाची वर्षें प्रत्येक मुलामुलीची खात्रीलायक कळण्यास आज मिती पासून पुढील पिढीची तजवीज मुनसिपाल रजिस्टर बुकानें होण्या सारखी आहे ही मोठी आनंदाची गोष्ट होय. मुनसिपालिटीतून नोंद बुकांतील दाखला कोणास लागेल त्यांनीं कांहीं फी भरून मागून घेतां येईल अशा प्रकारची व आणखी कांहीं दुसऱ्या प्रकारची सुधारणा बहुमतानें मुनसिपालिटीच्या जनरल सभेंत व्हावी असें आह्मी इच्छितों.

येथील मागुमशावली कडील नदीच्या धरणा वरून रहदारीचा रस्ता आहे परंतु तो अलिकडे इतका धोक्याचा व नाजुक झाला आहे कीं मुनसिपालिटीनें अजूनही त्याकडे दुर्लक्ष व हयगय केल्यास कांहीं अपमृत्यु होण्याचा मोठा संभव आहे. तेव्हां तसाच कांहीं प्रसंग गुदरण्यापूर्वीं योग्य तजवीज होणें अवश्यक आहे. रेसिडेंट साहेबांच्या मर्जीसाठीं नदीच्या वरील भागाच्या धरणावरून आंवळ्यास जाण्या येण्या सारखी व्यवस्था केली. त्या अर्थीं मूळ रेसिडेंट किंवा मुनसिपालिटी ज्या रयतेसाठीं अस्तित्वांत आहे तिच्या प्राणरक्षणा निमित्त नदीच्या खालच्या धरणा वरून चांगला सोयस्कर मार्ग झाला पाहिजे किंवा लष्करी कायद्या प्रमाणें प्रस्तुतचा मार्ग अजिबात बंद झाला पाहिजे, वरील दोन उपायांपैकीं कोणता अमलांत येईल तें पहावें!

---

असाम प्रांतांत मणिपूर संस्थानांत चालू असलेली धामधूम बऱ्याच निकटीच्या थरावर येऊन. पोहचली भांडण्यास मूळ कारण झटले ह्मणजे राजघरांतील भाउबंदकीचे कज्जे व कुरापती होत. एक दुसऱ्यावर आपला डावपेंच साधावयास पहातो. या भांडणा मुळें इंग्रज सरकारांस त्या संस्थानांत हात घालण्यास चांगलें सांपडेल वेळेवर जो मबळ असेल त्यास सहाय करून आपला कार्यभाग उरकावा हा धडा ह्या आपल्या इंग्रज सरकारास चांगला समजला आहे. आजमिती पर्यंत जी बातमी आहे तीवरून तर त्या संस्थानाचा भयंकर परिणाम होईल— ह्मणजे त्याची स्वतंत्रता जाऊन ते हिंदुस्थान सरकारचे वशांत उतरेल. हिंदुस्थान सरकारानें फौज फाया जमवून त्या संस्थाना सभोंवती गराडा घालण्याचा प्रयत्न केला आहे. त्या धामधुमींत बऱ्याच युरोपिअन आफिसरांची आहुती झाली या मुळें साहजिकच सरकारांस ज्यास्त त्वेष येणार. पुढें कसें कसें होते हें पाहण्याकडे सर्वांचें लक्ष लागलें आहे. तेथील एकंदर साद्यंत इतिहास पुढें देण्याचा आह्मी यत्न करूं. असल्या धामधुमीचें कच्चो हकीकत तरी कळणें हे आमचे वाचकांस फार महत्वाचे होईल.

---

## The Berar Samachar

**MONDAY, APRIL 13, 1891.**

The 'Age of Consent' law we must obey because its sanction extends to the extreme terror of the law excepting capital punishment. Secondly it is binding upon us because it aims at reform. We shall shout reform from house-tops and shall therefore accelarate the ends of the law. However futile [illegible] its educative effect and mischieve[illegible] in its operations it preaches a phi[illegible]sophy of

reform. We dread the law because we realize the grand issue involved in the present measure of legislation.

*The will of the majority.*

The utmost of civil freedom is enjoyed by a nation as a whole when the will of the majority is the law of the nation. By majority we mean the majority of persons who are legible to vote i. e. men capable of reasoning and understanding not with the exclusion of their feelings and prejudices. The will of majority is the test of a measure of public utility and expediency. It is sacred with the English Parliament. It is the byword of the National Congress. It is in fact the key-note of a constitution as it claims support from the science of politics. In England the will of the majority rules while in India it is ruled over. This difference makes England free and India a political serf. With duly ostentatious regard to this will the govt. invited discussion and criticism on the 'age of consent' question. But its final stroke undid every good thing of the past. The National Congress is an institution to harmonize the will of the sovereign with the aspirations of the subject-races. The Congress is an useful organ if it represents the majority in its proceedings. If men cannot join hands in harmony to obey the will of the majority and allow their hobbies to ride over the wishes of the masses let Congress close its shop in regard to its political and social aims. Can any one institute a claim to reason when some legislationists ask the govt. to strengthen minority against its rivals when as Congresswallas, they demand govt. to listen to what they profess as an opinion of the nation? Here is a grand inconsistency and let *reformers* perceive it. So there is a claim upon the Congress to condemn the policy of govt. in regard to the passing of the bill according to their *pleasure* in the face of the best & the strongest public opinion.

The fiction of the Proclamation—

The Magna-Charta of India is then a document elastic enough to afford justification and explanation to any governmental action. Either men are ignorant of the longitude and latitude of their charter which is like the riddle in Macbeth that 'he never should be vanquished till Bernane Wood were brought to Dunsinane' or their rights have been overthrown in the interests of humanity. It is of first rate importance that there should be a clear and legal exposition of the Proclamation.

What is the remedy? The last remedy open to us is to beg of the Parliament justice to a cause of the people. Parliament represents in its complex nature the cause of the people and will never forget the proper claims of their subject nation. Funds must be amply provided to carry out this programme and let men learn to win with their purse and person every thing of their own at stake before the English govt,

*Who will be our M. P?*

If our argument be a piece of barbarism let us close with our petitions. But let us not sacrifice truth for want of a champion. But if men there be to see the good of it we are sure that some grand old-man we shall find to hold up our cause for the sake of noble justice.

## THE VICE REGAL COUNCIL.

The Age of Consent Bill has passed into the law of the Land. The way in which it was dealt with in the vice-regal council, the haste and the manner which mark the procedure of this important Bill are all characteristic of the Indian Administration. The public did its best to represent its opinion but all to no purpose. The irresponsible character of the councils and the high-handed policy of the Government are thus evident; still no steps are taken to get them remodelled. As we think that the discussions in the vice regal Council on this Bill will be interesting we give some of the speeches in brief.

Sir A. Scoble after expressing his regret for the absence of his honour able friend R. C. Mitter, remarked at the outset that the recent discussions on the Bill show that outside Bengal there is very little opposition, & that in Bengal the extent and the importance is not so great as has been represented. Then he proceeds to take the arguments one by one. With reference to the objections that the evil does not exist he quotes the opinions of 4 or 5 Bengal Officers and refers to 2 or 3 criminal cases. He concludes this point by quoting one or two medical opinions and refers to the petitions of the women from Bombay &c, which he states show the opinion of the bulk of women. He states that the evidence of the doctors that they had not dealt with such cases is of negative character. With regard to the objection that the Bill is a departure from the proclamation, the Hon. Mover states that there is no such undertaking of absolute non-interference and the Parliament sec §19 of the Councils Act of 1861 has given a fatal blow to such a construction by enacting that measures affecting religion may be introduced into the council with a *due regard* to ancient rights and usages. Further he states that attention is paid as much as is compatible with the Paramount claims of the English Govt. and claims of humanity and justice. With regard to religious arguments he states the construction put upon the shastras in Bengal is not accepted else where and that balance of argument and authority is in favour of the Bill and lastly he wishes to be in the wrong with Dr. Bhandarkar and others than in the right with Tilak and others. With reference to the particular right Garbhadhan he states that this is not observed throught Bengal or India and that it is posponed on secular grounds and that the penance in default is trifling. He hopes that to those who wish that reforms should be from within, this act will be a great help. After this Sir A. Scoble comes to the consideration of the various amendments. The amendment to substitute puberty or twelve was not adopted as it would afford a loop hole for all cases and that puberty may be brought in artificially by objectionable drugs and medicines. With regard to the lessening of the punishment he states that he leaves it to the consideration of the Court according to the circumstances of the case; the amendment that prosecution shall not be allowed except at the instance of the child wife herself was not adopted as it would turn the law into a dead letter.

After some speeches on the part of the Honourable members His Excellency rose to speak. He dealt at great length with the 2nd argument which sets down this Bill as departure from the Proclamation. His Excellency stated that the Procl. ought to be taken with two reservations. 1st Where demands of religion would lead to practices inconsistent with individual safety and public peace and condemned by every religion and morality in the world it is religion & not morality which must give way. 2nd Where there is a conflict between the interest of morality and religion, the Legislature is bound to discriminate between essentials and non-essentials fundamental beliefs and subsidiary ones. With regard to religious objections he concurs with Sir A. Scoble & states that the rite is not indispensable, that it is a local custom, that it can be pospoued and that the penalties for their non observance are trifling. After dealing with other objections His Excellency concludes by promising that the Governor will closely watch the operation of this amendment.

The two speeches contain the whole of the arguments in favour of the bill. We cannot conclude before giving at least the line of criticism that is indicated by the views of the oppositionists:—

1st Argument of utility urged by R. C. Mitter not noticed with others.

2nd Opposition made much light of. Really it is greater and in the case of religious beliefs it ought to be respected.

3rd For humanity and philanthropy there are any other things such as deduction of Salt duty. False humanity as in the case of Factory Legislation movement in Lancashire.

4th Governor lost more by framing this, an act of questionable utility.

5th Amendment of puberty not properly dealt with.

The Congress ought not to interfere with social problems. But it is now a matter of doubt whether the Congress should not express a view on the action of Government which is notoriously opposed to the public opinion— public opinion as far as was concerned in the 'Age of Consent' law. This public opinion comprises the two grand factors of the population of India. The position of the Congress was ably portrayed by Mr. Man Mohan Ghose in December last and we quote from ourselves the abstract of his statesmanlike record and ask men of any party or clique to decide their attitude to the next *proceedings* of the Congress session at Nagpur:—

"The Congress is not antagonistic to social reform. Lord Dufferin was the first to direct its attention away from the political matters to the *proper* sphere of social improvement. But it is to confound and misapprehend the scope and function of the National Congress. Its object is to point out the defects in the administration and to ask for such reforms as we are ourselves absolutely incapable of introducing without the aid of the Government. The solutions of the many questions of social reforms are entirely in our own hands. It is open to all of us to live as we like, or to eschew or alter at any time any custom which we may consider inconvenient and mischievous. Besides the diverse communities require diverse social reforms and leave no common platform for national alliance. The same educational agency which has given life to the National Congress has already helped to bring about enormous social changes throughout India. The promoters of the Congress are keenly alive to the importance of social as well as to that of political reforms, and ought to remember that any precipitate or inconsiderate action, before the creation of a healthy public opinion in a community, is apt to retard progress and to defeat the very object they have in view. But these are social problems with which the Congress composed as it is of different communities, ought not at present, to have any *direct* concern."

A veteran master printer in St. Louis recently said to a local reporter: "We are on the eve of a great revolution in the typographical appearance of literary matter, especially newspapers, that is, the use of black paper printed in white letters, instead of white paper printed in black letters, as now. The change is one to be desired by the public, for the reason that the white letter on a black ground posses greater contrast and distinctness, and is, consequently, easier on the eyes. The change will give at first an odd enough appearance to printed matter, but the merit of it will eventually result in its general adoption, and in time the black letter will be as rare as the white letter now is. Sign painters and show card printers recognise the superiority of the white letter, and are rapidly adopting it, as is evidenced by the numerous white lettered signs now to be seen on the streets and in the shops The change would be comparatively inexpensive to publishers, and as black is cheaper than white paper, a saving could be effected. With our newspapers thus printed, reading on cars and in dimly-lighted places would be not only practicable, but easy." F. W.

## वऱ्हाड.

हवामान—या आठवड्यांत दोन दिवस बराच पाऊस पडला आणि मेघ गर्जना व विजेच्या चकमकी या मुळें आगाऊ पावसाळा आल्या सारखें वाटूं लागलें. परंतु त्या नंतर उन्हाळा फार प्रखर होऊन उष्मा विशेष भासूं लागला आहे.

वऱ्हाडांत नवीन सुरू केलेल्या डायरेक्टर आफ लँड रिकार्डचे खात्याची पद्धतवार उभारणी होण्याचें घाटत आहे. त्या व्यवस्थेंत हेड क्लार्कचा पगार १५०-२०० रुपये पर्यंत असून त्याच्या हाताखालीं ७५ ८० चा एक सेकंड क्लार्क नेमला जाईल व या खेरीज आणखी वीस पंचवीस कारकुनांच्या नवीन जागा होणार आहेत. तेव्हां काहीं वशिल्याच्या, आर्जवी व कर्तबगार गृहस्थांस या लहान मोठ्या जागे निमित्त आपापलीं तारायंत्रें चालूं करण्यास ही बातमी पूर्वसूचना होय.

सन १८८९ सालच्या पाटील पटवारीच्या कायद्यासंबंधानें डेपुटी कमिशनरचे सर्व हक्क रेसिडेंट साहेबांनीं खालील हुद्देदार गृहस्थांस दिले आहेतः—

विश्वनाथ नारायण दांडेकर, वामन नारायण आपटे, केशवराव जयकृष्ण, आर. डेव्हीस, आणि कुमार श्री हरभानजी.

हैद्राबाद येथील हास्पिटल आसिस्टंट वर्गा साठीं येणाऱ्या उमेदवारांची परीक्षा आज उमरावतीस व हैद्राबादेस सुरूं होईल.

वऱ्हाडांतील वकिलांची परीक्षा येत्या आगष्ट महिन्याचे अखेर तारखेस उमरावती सालाबाद प्रमाणें सुरूं करण्याचें ठरलें आहे. नागपूर प्रांतांतल्या प्रमाणें इकडील वकीली विषयीं कांहीं प्रतिबंध नवीन घालण्याचा प्रांतिक सरकारचा विचार आहे असें लोक बोलतात.

रा. रा. गणेश बापूजी यांस असिस्टंट कमिशनरचे पूर्ण मुलकी हक्क देण्यांत आले आहेत.

प्रमोद सिंधूवरून कळतें कीं उमरावती पोलीस सुपरिन्टेंडेंट मि. राबर्ट गालोवे हे तीन महिन्याच्या रजेवर विलायतेस गेल्यामुळें त्यांच्या जागीं असिस्टंट सुपरिन्टेंडेंट मि. कूड यांस नेमिलें आहे.

आम्हांस लिहिण्यास परम दुःख वाटतें कीं डेक्कन कालेजांत दुसरे बी. ए चे वर्गांतील वऱ्हाडचे तरुण गृहस्थ रा. रा. दिनकर नयाराम वहाळकर यांस पुण्यास नवज्वरानें देवाज्ञा झाली. होतकरू, सद्दढ व विद्वान अशा विद्यार्थ्यांस भरज्वानींत मृत्यूनें गांठलें व हा दुःखाचा डोंगर त्यांच्या मातापितरांवर, तरुण बायकोवर व आप्तमित्रांवर कोसळला हें पाहून प्रस्तुतच्या शिक्षण पद्धती संबंधानें भितीप्रद शंका मनांत घोळतात.

## वर्तमानसार.

बलगेरिया प्रांतांचे पेशासंबंधी दिवाण एम. बेल चेफ हे आपल्या घरांत शिरत असतां त्यांच्यावर रस्त्यांतून जाणाऱ्या एका गृहस्थानें बंदुक नेमानें सोडली. आणि या गोळीनें ते प्रधान थोड्या अवकाशांत मरण पावले. या बंदुक मारणाराबरोबर दुसरे दोघे गृहस्थ होते. ते तिघे गृहस्थ होते ते तिघेही बंदुक मारल्यानंतर कोठें नाहींसे झाले तें समजलें नाहीं. याच दिवाणबरोबर जाणारे मुख्य प्रधान यम स्त्यांबुलाफ यांस ठार माराव्या या तिघांचा बेत होता असें ह्मणतात. बलगेरिया प्रांतांचें एक वजनदार वर्तमानपत्र यासंबधानें ह्मणतें कीं ही गोष्ट रशियन गुप्त राजकारस्थानाभार्फत झाली असावी. ज्या ठिकाणीं खुन झाला त्याच्या जवळच्याच दुकानांत एक बंदुक विकत घेतल्या वरून त्यास पकडण्यांत आलें आहे. खरे आरोपी अजून पकडण्यांत आले नाहींत असें सोफियाची ता. २८ मिनहूची तार सांगते.

हिंदुस्थानांतील तार चिन देशांतील तारेशीं जोडून देण्याबद्दल खटपट चालविली आहे.

एकंदर जगाची लोकसंख्या १४८७६०००० आहे आणि त्यापैकीं युरोपची ३८०२००००० एशियाची ८५००००००० आफ्रिकेची १२७००००००० आस्त्रेलेशियाची ४७३०००० उत्तर अमेरिकेची ८९२५०००० आणि दक्षिण अमेरिकेची ३६४२०००० आहे.

मिरत येथें एक नेटीव दर्जी बरोबर एक तरुण कोमलांगी युरोपियन युवती घेऊन राहिला आहे. ही बाई मोठ्या कुळांतली असून तिचें वय २० वर्षांचें आहे. दर्जी बोवांनीं नका सुद्धा लावला आहे. प्रेम अंधळें आहे! येथें कायदे काय फाल्गुन वाद्य करणार!! युरोपियन नीतीचा हा मासला!!!

मद्रासचे प्रसिद्ध मुत्सद्दी सरटी माधवराव हे गेल्या १५ दिवसांपूर्वीं पक्षघातानें आजारी पडले आहेत या रोगाचा गेल्या एक दोन दिवसांत अतिशय जोर होऊन त्यांची स्थिती अतिशय भयंकर झाली आहे असें मद्रासची ता. २९ ची तार सांगते पण मद्रासची ता. १ मिनहूची तार सांगते. कीं कालपासून ते किंचित बरें झाले आहेत आणि थोडे बोलूंही लागले आहेत. तरी पण या रोगांतून ते खात्रीनें बचावतील अशी थोडीच आशा आहे. अखेर शनिवारीं सकाळीं ह्मणजे एप्रिल चौथे तारखेस सरटी माधवरावांस देवाज्ञा झाल्याचें दुःखकारक वर्तमान ऐकून सर्व हिंदुस्थान देश हळहळल्या वांचून रहाणार नाहीं.

पाण्याच्या दुर्भिक्षतेमुळें अलेक्झियांत लोक पटापट मरत आहेत. ठा० अ०

पार्लिमेंटांतील कामन्ससभेकडे हिंदुस्थानांत अफू पिकवून लोकांना व्यसनी करण्याचा जो सरकारचा निंद्य व्यवहार आजपर्यंत एकसारखा अव्याहत चालला आहे तो व्यवहार बंद करण्याबद्दलचा कायदा व्हावा याविषयीं अर्ज करून विनंति करावी, अशा अमेरिकन मिशनरी मंडळीकडून यत्न चालला आहे व त्याबद्दलचे अर्जाचे मसुदे हानोद्याचे हारें वगैरे चोहोंकडे फिरत आहेत. उद्देश स्तुत्य आहे.

सहारणपुरास एका बडेमेनें मुसलमानी धर्म स्वीकारला.

गेल्या आठवड्यांत कलकत्यास व त्याचे आस पास गाराचा फारच दांडगी वृष्टी झाली. ज्ञा० च०

पुणेवैभव कर्त्यांनीं मोठ्या कळकळीनें सदुपदेश केला आहे तो असा सर्व धर्मांच्या व सर्व मताच्या लोकांनीं, स्वस्थ बसूं नका आपल्या अब्रू करितां, आपल्या धर्मा करितां आपल्या चाली रीती करितां, आपल्या देशा करितां व शेवटीं इंग्रज सरकारच्या संमतीविया सारख्या जुलमी कायद्या करितां चेनीचा परकी कपडा सोडून द्या आणि देशी कपड्या शिवाय दुसरा कपडा वापरणार नाहीं एवढेंच नव्हे तर त्यांस शिवणार देखील नाहीं अशा आपल्या धर्माच्या, आपल्या आईबापांच्या व आपल्या परम पूज्य व्हिक्टोरिया बादशाहिणीच्या शपथा वहा! !

पु० वै०

प्रख्यात मार्जो कमिशनर क्राफर्ड यांच्या तर्फेंचे तिघे लेखक पालमाल ग्याझिटांत लेख लिहितात. क्राफर्ड साहेबांस कमिशन मिळालें पाहिजे हा त्या सर्व लेखांचा मुख्य आशय. कमिशननें निर्दोषी ठरविलें तर पेनशन देण्यास काय हरकत? असें मि. म्याक्लिन, एक लेखक प्रतिपादितात. कर्नल बान क्राफर्ड साहेबांनीं काढिलें याचें कारण वारंवार सरकारच्या पाहुण्याची बिदागी ठेवण्या बद्दल गव्हरनरांचीं पत्रें येत, असा मुद्दा हल्ली पत्रांतून आला आहे! क० त०

रशियन राजकुमारानें हिंदुस्थानांत फिरत असल्याचा मजकूर त्यांनें जी नोंद आपल्या रोजनिशींत वेळा वेळी करून ठेविली त्यांच्या आधारें आपल्या वडिलास पत्रद्वारा कांहीं गोष्टी कळविल्या त्यांतील पुढील भाग येणे प्रमाणें

मद्रास स्पेन देशापेक्षां मोठा आहे.

निजाम हैद्राबाद ग्रेटब्रिटनच्या बरोबरीचा आहे.

एकटी मुंबई स्पेन आणि पोर्चुगॉलची बरोबरी करील.

म्हैसुर स्काटलंड एवढें आहे.

वऱ्हाड स्वित्सर्लंडाच मागें सारील.

पंजाब आस्त्रेलियाची बरोबरी करील.

पश्चिमेकडील लोकांचा इकडे अधिक दिमाक दिसतो, कारण ते राजे आहेत; परंतु इंग्लंड अधिक मातबर होण्यास कारण हिंदुस्थान, यांत तिळा इतका संशय नाहीं.

ज्या देशावर इंग्लिश संपन्न होत आहेत, त्यादेशांतील लोकां विषयीं हयगय करणें हा आपल्या पद्धती प्रमाणें अति कृतघ्न पणा होय यांत हिंदु लोकांची तारीफ करावी तेवढी थोडी आहे. ते लोक हक्खोर असते तर बुटाच्यालाथा खाऊन इंग्लिश लोकांशीं इतक्या आर्जवानें वागतेना, तथापि इतर इलाख्यापेक्षां मुंबई इलाखा धाडसाचें कामांत अधिक आहे.

बंगालचे बाबू उपदेशक बनले असून विद्येच्या अंगानें काय पराक्रम दाखवितील तेवढाच.

मद्रासकडील लोक फारच भित्रे, पण अर्जी. आणि तावेदारीच्या कामांत पुरे वाकब त्यांच्या हातून अचाट काम होणें दुरापस्त आहे.

हिंदुस्थान देश सुवारल्याचा गवगवा रशियांत असतां एकिवांत येत असें, त्यांतला शतांश देखील खरेपणा माझ्या अनुभवास आला नाहीं, परंतु लोक बेपर्वा अधिक झाले, इंग्लिशांचा द्वेष मोडला, घोड्यावर बसण्याची कला विसरले, बंदुक घेऊन निशाण मारणें वगैरे रहित झालें. दांड पटा दिसेनासा झाला, पायधाव बुडाली, भाला, बांथाटी, लयास गेली; तालीम तिरंदाजी नाहींशी झाली; सनातन तावेदारीचा पेशा बुडाला, जुनाट धंद्याचा अभिमान झाकला गेला. दरबार दरकदाराचा हक्क उडाला, अठरापगड जात एक ठिकाणीं बसून खाऊ लागली, मान सन्मानाचा आदर लयास गेला, सचोटीचे ठिकाण बुडालें, दारुचा फैलाव ज्यास्त झाला, लोक निर्बळ होत चालले, नोमाची ओळख तुटली, लोभाची आशा सुटली, इकडे प्रत्येक ४ वर्षांआड कोणत्या तरी बाजूस दुष्काळ पडतो. त्यांत हजारो मनुष्यें अन्नाविणे मरतात; इंग्लिश त्याबद्दल विशेष काळजी घेते तर प्रत्येक १० वर्षांनीं लक्ष मनुष्याचा संहार अन्नासाठीं होण्याचें प्रमाण ठाम होणें इंग्लिश सरकारच्या राजनीतीस काळिमा आणणारें होय.

आपलें कडे केळीचें बन चांगलें करावयाचें तर त्यास पोषक अशा खातापाण्याची व्यवस्था करावी लागते. भातखाचरांतील खतानें जम कधी बसावयाचा नाहीं तसा हिंदुस्थानांतील लोक सुखी करण्यास अर्बस्थानांतील अथवा इंग्लंडची व्यवस्था कामाची नसून ती चालू करण्यास सुधारणा हा शब्द ऐकू येतो हें केव्हढें आश्चर्य ! !

हिंदुस्थानांत अमुक विद्येंत निपूण लोक नव्हेत असें ह्मणवत नाहीं. प्रत्येक कृत्य पहावें तर त्यांत कांहीं तरी विशेष अक्कल आढळून येते. उदाहरणार्थ विजापुरचा गोल घुमट, निजामचा गोवळकोंड्याचा किल्ला आग्र्याचा ताजमहाल!! बांधणी, काय खोदणी, काय कलब की ज्या दगडाच्या रेघांत सर्व कुराण वरुबून दिलें आहे; त्यांच्या पुढें क्यानलची हिकमत अथवा बोगद्याची विद्या सुधारणुकीच्या वर्णनांत कोण धरील असेल तो तर खुशाल धरो.

बडाच्या वेळेचे इतिहास पाहिले त्यांत "bad faith" या दोन शब्दांनीं हिंदुस्थानांतील त फारच मोठा घोटाळा केला. मराठींत त्याला "अभरंरसा" ह्मणतात. अद्याप त्याला अपुलकीची आठाळी इंग्लिशांनीं दिलेली आढळली नाहीं.

बंडाच्या वेळीं काश्मीरचे महाराज, भोपाळची बेगम, आणि नेपाळचे अधिपती यांनीं जिवापाड साह्य करून आपल्या अंगचे चोर दरवाजे बंद करून इंग्लिशांची प्रीति कमाविली असतां सध्या माझ्या पाहाण्यांत त्याच लोकांवर इंग्लिशांनीं अभाळ कोसळलें आहे; यांतील मतलब काय असेल तो समजू शकत नाहीं.


## सचित्रक्याटलाग.



आर. डी. कानिटकर आणि कंपनी मुंबई गिरगांव याचा नवीन तऱ्हेचा इंग्रजी किंवा मराठी अर्ध्या आण्याचें तिकिट पाठविल्यास मिळेल.

## जाहिरात.

एलिचपूर येथें होणारा सर्व प्रकारचा माल कोणास पाहिजे असल्यास आह्मांस कळवावें. माफक कमिशन घेऊन पाठवीत जाऊं. विशेष माहिती करितां टिकीट पाठवा.

जी. डी. कावेटकर
मर्चंट आणि कमिशनर एजंट
शहर एलिचपूर.

वामन गोपाळ यांचा अनेक औषध मिश्रित

## सार्सापरिला

हा सार्सापरिला अनेक रोगांवर गुणावह असून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणाकारी आहे. उपदंशजन्य विकार, (गरमी) व तिजपासुन होणारे पक्षघातादि भयंकर रोग, संधिवात, गंडमाळा, रक्त दुषितचें झाल्यापासून हाता पायांच्या तळव्यांवर व सर्व शरिरावर काळे डाग पडणें. संधी दुखणें कळा लागणें, सूज येणें वगैरे सर्व संधिगत वायुंवर तसेंच कोणत्याही प्रकारचे वचे चे रोग, जसें सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज, गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांचे, मस्तकाची व हातापायांची आग होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे. सारांश उपदंशजन्या पासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दूषित झाले असल्यास ते शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखे दुसरे औषधच नाहीं. दर बाटलीस किंमत १ रुपया, पोस्टेज ४ आणे; उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक धातु व रक्तवर्धक मिश्र फास्फरसाच्या

## गोळ्या

यापासून अतिशय विषयोपभोग, नित्य धातुस्त्राव यानें झालेली शरिराची क्षिणता जाऊन अशक्तता, अग्निमांद्य, जीर्णज्वर, नपुंसकत्व इत्यादि विकार तावडतोब नाहींसे होतात. यानें सर्व शरिरांतील चैतन्याचा व वृद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जाकंद (मेंदु) व मज्जातंतु यांच्या मंद झालेल्या सर्व क्रियांचे पुनःरुज्जीवन होतें. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायुची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणास जननेंद्रियाची शक्ति क्षिण झाली असल्यानें पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत. किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे. बंगी व पोस्ट मिळून एकापासून कितीही बाटल्या घेतल्या तरी ६ आणे पडतील.

पांढरे केस काळे भोर होण्याचा

## कलप

हा कलप प्रत्येक पंधरा दिवसांनीं एक वेळ लाविला ह्मणजे पुरे आहे. यानें सफेद करड्या व पिंगट रंगाचे केस काळेभोर होऊन त्यास तेज येते. किंमत १ रुपया पोस्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधासोबत मिळेल पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्ही. छत्रे याचे दवाखान्यांत वरील सर्व औषधें मिळतील.

आमचा पत्ता—नव्या ठाकुरद्वारा समोर


☞ हें पत्र अकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची अगाऊ रु० ५ डांक हाशील ०।३
सहामाही ” ३ ” ०।८
सालअखेर ” ७ ” १।०
किरकोळ अंकास…………………… ०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ……… ०।

Rs.
per annum in advance 5 Postage 13
Per annum in arrears 7 ,, 1Rs. 8 as
Six monthly……………3 ” 8 as
Single copy……………………4 as

Advertisements
Below 10 lines…2R
per line over10…4 as
Repetition per line 2as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXV AKOLA MONDAY 20 APRIL 1891 NO 15
वर्ष २५ अकोला सोमवार तारीख २० माहे एप्रील सन १८९१ इ० अंक १५

**HEALTH WEALTH & PROSPERITY.**
जी. बी. नाईक कंपनीच्या
**विजेच्या आंगठ्या व पुतळ्या.**

खात्रीचा माल घेऊन खोटा माल घेऊन

अनुभव पहा. फसूं नका.

**५०००० वर विकल्या.**

रक्त हें मनुष्याचें जीवित्व आहे व विद्युत्ता रक्ताचें जीवन आहे.

जग प्रसिद्ध आहे कीं, सर्व हस्पितलांमध्यें विजेचा प्रयोग रोगावर करितात. ज्याच्या आंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यास विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला आहे व त्यापासून पुष्कळ आजारी मनुष्यें औषधोपचारा शिवाय बरीं झालीं आहेत. याविषयीं हजारों डाक्टर साक्ष देतील.

रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग ह्या कड्यानाश करणारी पासून बरे होतात. संधिवायु, शिरांगत वायु, ठणका, हाडांतील दुःख, कंबरेंतील दुःख, वण किंवा सुज, भोंवर, पुरुषत्व भंग, अशक्तपणा, स्त्रियांचे रोग, काळजाचें दर्द, ज्वर, अर्धशिशी, मूत्रशयांतील रोग, मस्तक शूळ, मूळव्याध आणखी इतर होणारे रोग देखील निवारण केले जातात. अशी गुणकारी, सर्व रोग शमन करणारी, आंगावर सुशोभित दिसणारी ही सर्वांनवळ असावी हें योग्य आहे. ही एकदां घेतली म्हणजे आयुष्य भरची खटपट चुकली.

गुणाबद्दल हजारों दाखले मिळाले आहेत व मिळत आहेत.

किंमत वर लिहिली आंगठीस रु० १॥ व पुतळीस १।, चांदीचे आंगठीस रु. ३ व पुतळीस रु. ९, सोन्याचे आंगठीस रु० १० व पुतळीस रु० २२; एक डझन घेणारास एक जास्त मिळेल. एक पासून सहा नग पर्यंत ट० हा० सहा आणे. रोख दाम आल्यास किंवा व्हा० पे० नें मागविल्यास पाठवूं. आंगठी करितां बोटाचें माप पाठवा. विशेष माहिती पत्रका करितां अर्धा आणा पाठवावा.

विकत मिळण्याचा पत्ता:—मुंबई:—भायखळा दावणी समोर व पुणें:— बुधवार पेठ चौकांत.
जी. बी. नाईक आणि कंपनी. दावणी समोर, भायखळा, मुंबई. ६

केशर मिश्र व **बळभीम पाक.** पुष्कळ वनस्पती मिश्रित.

एकदम १०० तोळे पाक घेणारांस १। रु. ची विजेची पुतळी फुकट मिळेल.

हा पाक लोकांच्या अनुभवास आलेला व थोर लोकांनीं पसंत केलेला व खाण्याला गोड असून (५१ जिन्नसांतील लोकांस गुण आला आहे.) याच्या सेवनानें पुढें लिहिलेले गुण मनुष्याला प्राप्त होतात. नपुंसकत्वा सारखी नेभळाई नाहींशी होते. आंगावर चांगली कांती येते. शरीर पुष्ट होतें. धातु वाढते. स्वप्नावस्था व लघवींतून धातु जाण्याची बंद होते. योग्य वेळीं धातु लवकर पतन होत नाहीं. कामेच्छा वाढते. शक्ति येते. भूक चांगली लागते. शौचाला साफ होतें. डोळ्यांस थंडावा येऊन दृष्टि तीव्र होते. परम्याचा जुनाट रोग जातो. पित्त, आम्लपित्त, दमा, हगवण, आंव हे विकार जातात. स्त्रिया, पुरुष व मुलें यांनीं हा पाक घेण्यास कारण नाहीं आहे. किती ही तोळ्यांचे ३ डबे घेणारांस त्या मासल्याचा एकडबा बक्षीस देऊं. दर २० तोळ्यांच्या ड. २॥ रु०, ४० तो० ड० ४॥ रु०, ८० तो० ड० ८ रु०, १०० तोळ्यांच्या डब्यास १९॥ रु०, टपाल व बंगीबद्दल निराळा पडेल.

शिफारसपत्र—आपल्याकडून मागविलेला बळभीम पाक मी माझ्या स्त्रीस दिला. त्याची पांडुरोगासारखी भावना होऊन दिवसेंदिवस शरीर प्रकृति तेजहीन आणि अशक्त होत चालली होती, ती आपल्या पाक सेवनानें बरीच सुधारली. पुनः ८० तोळे पाक जरूर पाठवावा. रघुनाथ अनंत जमादार गदग रे० स्टेशन.

शिफारसपत्र—आह्मी तिघा मित्रांनीं मिळून आपला बळभीम पाक २७० तोळे घेतला आणि त्यापासून यावा तसा गुणही आला आह्मी चांगल्या मार्गीं पैशाचा व्यय केला याबद्दल आनंद होत आहे. पाक गुणकारी आहे यांत शंका नाहीं. हणमंत कृष्णाराव, हणमंत कृष्ण बि० व राघवेंद्र व्यंकटेश निडोकार.

पत्ता.— लक्ष्मण आप्पाजी पंडित धारवाडवृत्त ऑफीस. मु० धारवाड.

**सचित्रकॅटलाग.**

आर. डी. कानिटकर आणि कंपनी मुंबई गिरगांव ह्याचा नवीन तऱ्हेचा इंग्रजी किंवा मराठी अर्धा आण्याचें तिकिट पाठविल्यास मिळेल.

**जाहिरात.**

एलिचपूर येथें होणारा सर्व प्रकारचा माल कोणास पाहिजे असल्यास आह्मांस कळवावें. माफक कमिशन घेऊन पाठवीत जाऊं. विशेष माहिती करितां टिकीट पाठवा.
जी. डी. कानिटकर
मर्चंट आणि कमिशनर एजंट
शहर एलिचपूर.

वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र शुद्ध १२ शके १८१३

## मणिपूरचे मूळरहिवाशी यांचा वृतांत.

ह्या संस्थाना संबंधानें प्रथम दर्शनीं दृष्टीत्पत्तीस येणारी विशेष गोष्ट म्हटली म्हणजे तेथील सुपीक जमीन व मनमुराद नद्यांचे पाणी ही होय. अवघड डोंगराळ प्रदेशांतून अडचणीचे रस्ते ओलांडून ह्या प्रदेशांत येऊन तेथें सत्ता व राज्य स्थापित करण्यास जबर लालूच ह्या सुपीक प्रदेशाचीच असावी. व त्याप्रमाणें स्पर्धा महत्वास चढलेले व सत्तात्मक तेथील लोक ह्या लालचीस गुंतून चैनें मारीत आहेत. भिन्न प्रकारच्या व भिन्न देशांच्या राजांचे अमलाखालीं तो मुलुख वेळोंवेळीं जात गेल्या मुळें त्या सुपीक जमीनीवर निरनिराळ्यांचें स्वामित्व दृढावत गेलें. आज एकाच्या हातांत सत्ता व स्वामित्व, उद्यां दुसऱ्याच्या व परवां भलत्या च्याच येणें प्रमाणें घडामोडीच्या व्यवस्था झाल्या तद्देशीयांच्या दंतकथा वरून सांप्रत उपलब्ध असलेल्या माहिती वरून वर सांगितलेल्या वृत्तांतांत बरेच तथ्य आहे. मणिपूर प्रांतात सत्ता संपादन करण्या साठीं जितकीं घोर व अनन्वित रणें माजलीं व मारांच्या आहुत्या पडल्या तितका भयंकर प्रकार एवढ्या हिंदुस्थानाच्या कोणत्या ही भागांत झाला नाहीं. इतिहास दृष्टया कोणता ही ध्यानांत ठेवण्या जोगा काळ ध्या त्या वेळेस म्हणजे एकावर दुसरा चढ करून जात नाहीं असें नाहीं. एका खेड्याचे लोक दुसऱ्या शेजारच्या खेड्यास त्रास देऊन लुटून फस्त करता आहेत; तेंव खेडें अन्य प्रसंगीं वेळ साधून आपल्या शत्रूंनाय-थापत्य शासन करित आहे, असा प्रकार आढळतो. या धामधुमीच्या प्रसंगीं वृद्ध व दुबळ्या लोकांची गाळण होऊन त्यांचा फन्ना झाला. स्त्रियांचे गळेच कापले; लहान लेकरांचीं तर त्याचे आईबापांचे समोर शिरें उडविलीं. कुऱ्हाडदार तरणी ताठीं मनुष्यें सांपडलीं तशी बंदींत पडलीं. अशा प्रकारचे दुर्धर कहाळ माजत गेलीं. असे प्रकार वेळोवेळीं घडत गेले. अशा रीतीनें लोकांच्या रहवासांत, रीतिरिवाजांत, आचार विचारांत याच प्रमाणें टोलेजंग फरक पडत गेले. या त्यांच्या आचार विचारांस अनेक कारण परत्वें सुस्वरूप प्राप्त होत गेलें. इंग्रज सरकारचा आंमल हळूंहळूं पसरत गेल्या पासून व त्याचे जरब कडक रीतीनें बसूं लागल्या पासून वर सांगितलेले भयंकर परिणाम कमी व्हावयास लागले—ते इतके कीं आतांच्या घटके पर्यंत अगदीं त्यांचा मागमूस देखील नव्हता म्हटलें तरी चालेल. एवढ्या चळवळी होऊन इंग्रज सरकारचा आंमल बसण्याचे सुमारास कुकिस अथवा लुषई लोकांचे आंमलाखालीं तें संस्थान होतें. त्या लोकांचे मूळ वसतिस्थान चितगांगच्या वरचा डोंगराळ प्रदेश होता. परंतु कालान्तरानें लोकांत त्या देशांतून परमुलुखांत प्रयाण करणें भाग पडल्यामुळें खुद्द देशांत त्यांची संख्या बरीच कमी होत चालली. अलीकडील दोन तीनशें वर्षांत हे नाकीं राहिलेले लोकही उत्तर दिशेस आपलें पाऊल सरकवितां सरकवितां मणिपूर संस्थानांत येऊन धडकले.

हे लोक एकदमच एका काळीं ह्या प्रांतांत आले असें नव्हे. अतां कांहीं, मग कांहीं. ह्या रीतीनें अनेक वेळीं आले. ह्या त्यांच्या झुंडीस निरनिराळ्या वेळीं निराळ्या संज्ञा प्राप्त झाल्या. त्यां पैकीं दोन एक खोंगजाय कुकिष व दुसरी कोमकुकिष ह्या नांवांनीं प्रसिद्ध होत्या. आणि ह्या दोन्ही प्रकारच्या लोकांनीं व त्यांच्या अनेक जातभाईनीं क्रमाक्रमानें मणिपूर प्रांतांत प्रवेश केला—व त्या प्रांताच्या पश्चिमेस असलेल्या पर्वता वरून व डोंगरावरून दऱ्याखोऱ्यांत काल क्रमण करीत करीत सरते शेवटीं ह्या सुपीक प्रदेशांत ते फडकू लागले. एक तिसरी मोठी झुंड सुक्ति अथवा कुमहे नांवाची होती. हे लोक सांप्रत कांळीं खुद्द मणिपूरप्रांतास लागून असलेल्या दक्षिणे कडच्या प्रांतात राहता आहेत. म्हणजे अर्थातच तो पूर्व वाटाच्या बऱ्याच भागावरून खालीं उतरले असावेत. चवथी एक टोळीचासद अथवा चुकसद ही सुक्तीची एक शाखा होय. व नुकतेंच थोडे वर्षां पूर्वीं हे लोक बरेच प्रसिद्धीस आले. अलीकडे कुकिष लोकांच्या ज्या अनेक स्वाऱ्या मणिपूर प्रांतांत झाल्या त्या मुख्यत्वें करून ब्रह्मदेशांतून झाल्या आणि विशेषतः त्यांत ब्रह्म देशांतील एक सरदार संनाकचा राजा हा अधिपति होता. “बरा—

मणिपूरी" या नांवाची टोलेजंग इतिहासांत प्रसिद्ध असलेली जी स्वारी आहे तिचें आद्रिकरण म्हणजे ह्या धासद लोकांच्या चटपटांच्या स्वाऱ्या होत. मणिपुर प्रांतांत राहून संजोकथाच अम्मल कबूल करणें हा त्यांचा शिरजोर पणाच म्हणावयाचा नाहीं तर काय?

Six monthly...........3 " 8 as
Single copy...............................4as

# वऱ्हाडसमाचार.

Advertisements
Below 10 lines...2R
per line over10...4as
Repetition per line3as

THE BERAR SAMACHAR

VOL XXV AKOLA MONDAY 27 APRIL 1891 NO 16

वर्ष २५ अकोला सोमवार तारीख २७ माहे एप्रील सन १८९१ इ० अंक १६


## HEALTH WEALTH &PROSPERITY.

जी. बी. नाईक केपनीच्या

### विजेच्या आंगठ्या व पुतळ्या.

खात्रीचा माल घेऊन अनुभव पहा.



खोटा माल घेऊन फसूं नका.

५०८०७ वर विकल्या.

रक्त हें मनुष्याचें जीवित्व आहे व विद्युल्लता रक्ताचें जीव आहे.

जग प्रसिद्ध आहे कीं, सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोगावर करितात. ज्याच्या आंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यास विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला आहे व त्यापासून पुष्कळ आजारी मनुष्यें औषधोपचारा शिवाय बरीं झालीं आहेत. याविषयीं हजारों डाक्टर साक्ष देतील.

रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग ह्या लहानशा डबाटरी पासून बरे होतात. संधिवायु, शिरांगत वायु, ठणका, हाडांतील दुःख, कंबरेंतील दुःख, व्रण किंवा सूज, भोंवळ, पुरुषत्व भंग, अशक्तपणा, स्त्रियांचे रोग, काळजाचें दर्द, ज्वर, अर्धशिशी, मूत्रशयांतील रोग, मस्तक शूळ, मूळव्याध आणखी इतर होणारे रोग देखील निवारण केले जातात. अशी गुणकारी, सर्व रोग शमन करणारी, आंगावर सुशोभित दिसणारी ही सर्वांजवळ असावी हें योग्य आहे. ही डबाटरी एकदां घेतली ह्मणजे आयुष्य भरची खटपट चुकली.

गुणाबद्दल हजारों दाखले मिळाले आहेत व मिळत आहेत.

किंमत दर तिळी आंगठीस रु० १॥ व पुतळीस १।, चांदीचे आंगठीस रु.३ व पुतळीस रु. ३, सोन्याचे आंगठीस रु० २० व पुतळीस रु० २२; एक डझन घेणारास एक नग जास्त मिळेल. एक पासून सहा नग पर्यंत ट० हा० सहा आणे. रोख दाम आल्यास किंवा व्हा० पे० नें मागविल्यास पाठवूं. आंगठी करितां बोटाचें माप पाठवा. विशेष माहिती पत्रका करितां अर्धा आणा पाठवावा.

विकत मिळण्याचा पत्ताः—मुंबईः—भायखळा दावणी समोर व पुणें:— बुधवार पेठ चौकांत.
जी. बी. नाईक आणि कंपनि. दावणी समोर, भायखळा, मुंबई. ६



लोहभस्म केशर मिश्र व **बलभीम पाक** पुष्कळ वनस्पती मिश्रित.

एकदम १०० तोळे पाक घेणारांस १। रु. ची विजेची पुतळी फुकट मिळेल.

शिफारसपत्र—आपल्याकडून मागविलेला बलभीम पाक मी माझ्या खेड्यास दिला. त्याची पांडुरोगासारखी भावना होऊन दिवसेंदिवस शरीर प्रकृति तेजहीन आणि अशक्त होत चाललेली होती, ती आपल्या पाक सेवनानें बरीच सुधारली. पुनः ८० तोळे पाक जलदी पाठवावा. रघुनाथ अनंत जमादार गडग २० स्टेशन.

हा पाक लोकांच्या अनुभवास आलेला व थोर लोकांनीं पसंत केलेला व खाण्याला गोड असून ( ५।६ जिल्ह्यांतील लोकांस गुण आला आहे. ) याच्या सेवनानें पुढें लिहिलेले गुण मनुष्याला प्राप्त होतात. नपुंसकत्वा सारखी नेबळाई नाहीशी होते. आंगावर चांगली कांती येते. शरीर पुष्ट होतें. धातु वाढते. स्वप्नावस्था व लघवींतून धातु जाण्याची बंद होते. योग्य वेळीं धातु लवकर पतन होत नाहीं. कामेच्छा वाढते. शक्ति येते. भूक चांगली लागते. शौचाला साफ होतें. डोळ्यांस थंडावा येऊन दृष्टि तीव्र होते. परम्याचा जुनाट रोग जातो. पित्त, आम्लपित्त, दमा, हगवण, आंव हे विकार जातात. स्त्रिया, पुरुष व मुलें यांनीं हा पाक घेण्यास फारच नामी आहे. कितीही तोळ्यांचे ३ डबे घेणारांस त्या मासल्याचा एकडबा बक्षीस देऊं. दर २० तोळ्यांच्या ड. २॥ रु०, ४० तो० ड० ४॥। रु०, ८० तो० ड० ८ रु०, १०० तोळ्यांच्या डब्यास १९॥ रु०, टपाल व बंगखर्च निराळा पडेल.

शिफारसपत्र—आह्मी तिघा मित्रांनीं मिळून आपला बलभीम पाक २७० तोळे घेतला आणि त्यापासून याचा तसा गुणही आला आह्मी चांगल्या मार्गीं पैसा-चा व्यय केला त्याबद्दल आनंद होत आहे. पाक गुणकारी आहे यांत शंका नाहीं. हणमंत कृष्णापराव, हणमंत कृष्ण वि० व राघवेंद्र व्यंकटेश बिडीकार०

पत्ता— लक्ष्मण आप्पाजी परंतु धारवाडवृत्त ऑफीस. मु० धारवाड.



## जाहिरात.

एलिचपूर येथें होणारा सर्व प्रकारचा माल कोणास पाहिजे असल्यास आह्मांस कळवावें. माफक कमिशन घेऊन पाठवीत जाऊं. विशेष माहिती करितां टिकीट पाठवा.

जी. डी. काविटकर
मर्चेंट आणि कमिशनर एजंट
शहर एलिचपूर


वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र वद्य ३ शके १८१३

नुकतेंच झालेल्या मद्रासचे पदवी दानाचे समारंभाचे वेळीं डाक्टर डंकन प्रेसिडेन्सी कालेजचे प्रिन्सिपाल यांचें फार सुरेख भाषण झालें. आमच्या सुशिक्षित लोकांनीं त्यांचे भाषणांतील मुद्दे लक्षांत धरण्यासारखे आहेत. ते ह्मणाले कीं सुशिक्षित लोकांनीं युनिव्हरसिटीच्या परिक्षा दिल्या ह्मणजे आपण कृतकृत्य झालों असें समजूं नये. झालेलें शिक्षण हा पुढील शिक्षणाचा आधारभूत पाया आहे. या पायावर इमारत उठविणें हें प्रत्येक मनुष्याचें काम आहे. व जर शिकलेले लोक या प्रमाणें वागतील तरच त्यांचे शिक्षणाचा उपयोग. आमचे शिकलेले लोक या प्रमाणें वागतील तर देशाचा फार फायदा होईल. शिकलेले लोक परिक्षा दिल्या कीं देतात पुस्तकांना रजा. या प्रमाणें शिकलेल्या ज्ञानावर परिश्रम होत नाहींत व अशा रीतीनें व्यासंग झाला नाहीं ह्मणजे आपोआपच आळस आपलें ठाणें बसवितो. यावर असा आक्षेप येईल कीं लोक उर फोडून अभ्यास करून कसें तरी पोट भरण्याचे उद्योगास लागतात व दिवसभर उद्योग करून दमल्यामुळें पुष्कळ सुशिक्षित लोकांस अभ्यासाकडे लक्ष देण्यास वेळ सांपडत नाहीं. या आक्षेपांत कांहीं तथ्य नाहीं असें आमचें ह्मणणें नाहीं परंतु या आक्षेपाखालीं सर्वांस दडावयास सांपडतें. एकंदर वेळ कोणच्या रीतीनें जातो याचा विचार केला तर बराच वेळ गप्पा मारण्यांत किंवा तशाच प्रकारचे दुसऱ्या गोष्टींत जातो असें दिसून येईल. मर्जीनें चार लोकांत बसणें वाईट नाहीं; परंतु अशा वेळेचा चांगला उपयोग होत असून अशा रीतीनें वेळेचा दुरुपयोग करणें हें वाईट आहे. अशा प्रकारचे लोक खेरीज करून इतर सुखवस्तु सुशिक्षित लोक वेळेचा चांगला उपयोग करणारे किती तरी निघतील? या वरून हें सिद्ध होतें कीं बरेच तरी लोक निदान आपलें काम बजावीत नाहींत असें ह्मणण्यांस आह्मांस फारसो हरकत दिसत नाहीं. अतां कांहीं श्रम करीत असतील परंतु लोकांपुढे कांहीं कारणामुळें येत नसतील तर त्याचा दोष त्यांचेकडे नाहीं. या कामांत आमचे शिकलेले लोकांनीं डाक्टर भांडारकर, प्रो. सेल्बी साहेब यांचा कित्ता उचलावा. निदान कांहीं वेळ तरी वाचनांत किंवा तशाच प्रकारच्या उद्योगांत घालवावा. डा. डंकन यांनीं ज्ञानाचा प्रसार करणें व लोकांची नीति वाढेल अशा प्रकारचे उद्योग करणें हें प्रत्येक सुशिक्षित मनुष्याचें काम आहे असें सांगितलें.

सुशिक्षित लोकांचा फार सुकाळ झाला आहे. व त्यांचा व्हावा तसा कांहींच उपयोग होत नाहीं या आक्षेपा संबंधानें डा. डंकन ह्मणाले कीं असें असण्यास तीन कारणें असूं शकतील एकतर शिकणारे लोक शिकण्याच्या उपयोगी नसतील, किंवा शिक्षण पद्धतीमध्यें दोष असतील किंवा शिकलेले लोक आपली कामगिरी बजावित नसतील. शिक्षण पद्धतीचे संबंधानें आह्मांस इतकेंच सांगावयाचें आहे कीं पहिल्या पासून तों शेवटपर्यंत घोकंपट्टीचा तडाखा असतो. बंगाल इलाख्यांतील युनिव्हरसिटीचे पदवी दानाचे समारंभाचे वेळीं चान्सेलर साहेबांनीं या गोष्टीचा उल्लेख केला होता व मुंबई इलाख्यांत अशीच व्यवस्था आहे असें बॉंबे ग्याझेटांतून आलें होतें. घोकंपट्टीमुळें लोकांचे स्वतःचे विचार प्रगल्भ होऊन जो परिणाम व्हावयाचा तो होत नाहीं; शिकलेल्या लोकांची बुद्धि संकुचित राहते. व पुढें श्रम करून अभ्यासाचा व्यासंग ठेविला नाहीं तर अभ्यासाचा व्हावा तसा उपयोग नाहीं. ही कालेजामधील गोष्ट झाली. इंग्लिश मराठी शाळेंत व हायस्कुलांतील शिक्षणक्रम व अभ्यास याचा विचार केला तर घोकंपट्टीलाच विशेष मान मिळत आहे. असें दिसून येईल. तिसरे यत्तेंतील इतिहास भुगोला पासून तों दहावे यत्तेपर्यंत मुलांची समजून घेण्याची इच्छा जागृत नसते. कसें बसें तरी करून एकदां पाठ करून टाकलें ह्मणजे झालें हा त्यांचा उद्देश असतो. शिक्षकांनां सुद्धा ह्याच रीतीनें लागतें. कारण वर्षांत दिलेला अभ्यास चांगला समजून सांगत बसलें तर संपण्या सारखा नसतो व अभ्यास संपो किंवा न संपो मुलांची परिक्षा सर्व अभ्यासांत घेतली जाते व यावर मग परिक्षकांची लहर—या रीतीचा अभ्यास व तो घुसांकडू करून अशा रीतीनें करवून घेण्याची रीत मग मुलें घोकून घोकून अभ्यास करतील यांत काय नवल! मुलांनां मारतरचें समजून देणें कठिण आवडतें. कारण एक तर अशा रीतीनें अभ्यास तयार ठेवण्यास प्रथमारंभी त्रास पडतो व परिक्षेंत त्याचा तादृश उपयोग होत नाहीं. या गोष्टीला दोन उपाय आहेत एक तर अभ्यास थोडा कमी करणें. परिक्षेंत मुलांचे स्वतांहाचे बुद्धिकौशल्याकडे विशेष नजर ठेवणें. या गोष्टींत आमचे डासरकर साहेब

मन घालून वऱ्हाडांतून घोकंपट्टी कांहीं अंशीं तरी काढून टाकतील अशी आह्मास उमेद आहे.

डा. डंकन यांचे भाषणांतील शेवटला मुद्दा स्त्री शिक्षणाचे संबंधाचा आहे. डा. डंकन यांचे मतानें स्त्रियांना चांगलें शिक्षण मिळाल्या खेरीज हिंदुस्थानची खरी उन्नती होणार नाहीं. स्त्रियांनां शिक्षण कां द्यावें या संबंधानें डाक्टर साहेबांनीं एकंदर तीन कारणें दाखविलीं आहेत एक तर ज्ञानाचा परिणाम चांगला होतो म्हणून. दुसरें स्त्रीशिक्षणामुळें मुलांचें शिक्षण व संभाळ अधिक चांगल्या रीतीनें होईल. व तिसरें सुशिक्षित लोकांनां सुशिक्षित स्त्रिया मिळून त्यांना सौख्य होईल. डाक्टर डंकन तिसऱ्या मुद्यावर बोलतांना ह्मणाले कीं निदान आपल्या सुखा करितां तरी लोकांनीं शिक्षण द्यावें. यावर आह्मांस इतकेंच सांगणें आहे कीं, स्त्रीयांना शिक्षण द्यावें, परंतु डाक्टर साहेबांनीं हें शिक्षण कोणत्या रीतीनें द्यावें व हें कोणत्या प्रकारचें असावें याचा उल्लेख केला नाहीं. तरी आमचे मतें मुलांना ज्या रीतीचें शिक्षण मिळतें—व तें हीं पुन्हा इंग्रजींतून तसें देण्यामुळें फायद्या पेक्षां तोटेच विशेष होतील. कांहीं म्हटलें तरी पुरुष व स्त्रिया यांनां नैसर्गिक रीत्याच निरनिराळीं कामें पडतात व त्याच रीतीनें ईश्वरानें बुद्धि शक्ति आदि करून दिलीं आहेत. जरी मिस फासेट सारख्या कांहीं स्त्रिया अलौकिक रीतीनें विद्वान् निपजल्या व त्यांनीं आपल्या बुद्धिवैभवानें लोकांना चकित करून टाकलें तरी स्त्रियांचें मुख्य काम घरची व्यवस्था ठेवणें, मुलांचा संभाळ करणें व पुरुष मंडळी बाहेर कामावर गेलीं असतां घरची सर्व प्रकारची व्यवस्था राखणें हीं होत. मग हीं कामें त्यांच्यावर नैसर्गिकरीत्या येवोत किंवा पुर्वापार सामाजिक व्यवस्थे मुळें येवोत. कांहीं असो: हिंदु समाजाचे स्त्री वर्गावर तरी हीं कामें पडतात हें निर्विवाद आहे. आतां ही व्यवस्था मोडून टाकणें किंवा अशा व्यवस्थेला दुसरें वळन देणें या गोष्टीचा लोकांनीं पुर्णपणें विचार करावा. आमचे मतें आमच्या स्त्री वर्गाकडे जीं कामें आहेत तीं चांगलीं व तीं कामें त्यानां चांगल्या रीतीनें चालवितां येतील अशा प्रकारचें त्यांनां शिक्षण द्यावें. फावल्यावेळीं त्यांनां इतर गोष्टींचें ज्ञान करून द्यावें; परंतु हें ज्ञान त्यांच्यांत जिज्ञासा उत्पन्न करून. तोंडी देणें चांगलें; वाचून जरी त्यांनीं हें ज्ञान संपादन केलें तरी चिंता नाहीं परंतु कांहीं झालें तरी इंग्रजी मधून स्त्रियांना हें शिक्षण देण्याची रीत आह्मांस बिलकुल पसंत नाहीं. मुलांवर ह्या दुबार शिकण्याचे परिणाम काय झाले आहेत ते दिसतच आहेत. मुलांनां मानसिक श्रम फार होतात व जरी पुष्कळ मानसिक श्रमापुढें शरीराची काळजी रहात नाहीं हें जरी खरें असलें तरी निव्वळ मानसिक श्रमामुळें आमच्या पैकीं पुष्कळ विद्वरत्नें मृत्यु मुखीं पडत आहेत हें निर्विवाद आहे व हें एक कारण असो किंवा नसो: आमच्या मंडळीची व विशेषें करून शिकलेल्या लोकांची आयुर्मर्यादा दिवसानुदिवस कमी होत जाते हें लक्षांत ठेविण्या सारखें आहे. अशा रीतीचा अनुभव असून आमच्या स्त्री वर्गाला अशा शिक्षणाची आवश्यकता आहे असें आमचे सुधारक ह्मणतात तेव्हां त्यांची धन्य आहे ह्मणावयाची!! इंग्लिश लोक व जर्मन लोक सुद्धा या कालीं शिक्षणाचे संबधानें जागे होत चालले आहेत. त्यांच्यामध्यें परकी भाषे मधून शिकण्याचा त्रास नसून ही जर ते या वरिष्ट शिक्षणाला दोष देताहेत तर आह्मी मागचा पुढचा विचार करणें किती जरूरीचें आहे हें दिसतेंच आहे 'दुराळली मेंढी लागली कांडग्याचे पाठीमागें' या ह्मणी प्रमाणें आमचे सुधारकांनीं आपल्यावर व लोकांवर उगीच संकट आणूं नये. दुसरें सध्या चालूं असलेल्या शिक्षणामुळें घोकंपटी खूप वाढली आहे व जर लौकरच फेरबदल चांगलासा झाला नाहीं तर हेंच जास्त जास्त होत जाणार. हाच क्रम जर मुलींचे संबंधानें चालविला तर आमच्या मुली ज्या आज बऱ्या दिसतात त्या कांहीं दिवसांत शिकलेल्या लोकांचे तोंडाच्या होतील. मग मात्र जोडा शोभेल खरा- लोकांनीं मुली शाळेंत घालाव्यात पण तें शिक्षण ३।४ यत्ता पलीकडे असूं नये. या पलिकडे शिक्षण स्त्रियांचे उपयोगाचें ( घर कामांत लागणारें ) असावें. स्त्रियांचे उपयोगाचें बरेंच शिक्षण स्त्रियांनां माहेरी घरीं मिळतें. हें शिक्षण शाळेंत मिळण्याचा संभव नाहीं; व या प्रकारचे शिक्षण बुडून देण्या विषयीं मुलींचे आई बापानीं जपावें. श्रीमंत मंडळींनीं आपल्या मुलींनां किंवा घरांतील दुसऱ्या स्त्रियांनां इंग्रजीचें वगैरे फाजिल शिक्षण पाहिजे तर द्यावें किंवा देववावें; परंतु हें सुद्धां घरांत होईल तो पर्यंत बरें व दुसरी गोष्ट या शिक्षणाचा शरीरावर कांहीं परिणाम होऊं नये ह्मणून फार सावधगिरी लोकांनीं राखली पाहिजे.

---

राष्ट्रीय सभेची चालूं वर्षाची बैठक नागपुर शहरीं होणार आहे हें सर्वांस विदित आहेच. ही सभा त्या ठिकाणीं पहिल्यानेंच भरणार असल्या मुळें सभेच्या व्यवस्थे निमित्त मि. ए. ओ. ह्यूम साहेब व वऱ्हाडांतील प्रमुख गृहस्थ नागपुरास जात येत आहेत व किरकोळ सभा भरवून बातबेत ठरवीत आहेत. राष्ट्र सभेस येणाऱ्या पाहुण्यांची तजवीज सर्व प्रकारें उत्तम ठेवण्याच्या कामीं मुंबई, कलकत्ता, मद्रास, अल्हाबाद हीं शहरें चांगली वाकबगार आहेत. त्यांतल्या त्यांत एकमेकावर सरशी होण्या साठीं पहिल्या वर्षा पेक्षां दुसऱ्या वर्षाचा समारंभ मोठ्या थाटावर केला होता. त्याहून तिसऱ्या वर्षीं ही चढाओढीची मजल फार मोठ्या पायरीवर पोंचली. मद्रासची सभा राजदरबारच्या श्रीमान रीवाजावर झाली होती आणि अल्हाबादचा समारंभ त्या पेक्षां ही एक कांकणभर जास्त होता. त्या मागून कै० ब्राडला साहेब सभेस हजर होते त्या वेळच्या मुंबईच्या अनुपम व जंगी सभेचें वर्णन करण्यास शब्द ही सुचले नाहीत. राष्ट्रीय सभेच्या या बैठकींत प्रतिनिधींची संख्या हजार पर्यंत नियमित केल्या मुळें व काटकसरी कडे लोकांचें लक्ष्य लागल्या मुळें गेल्या कलकत्याच्या सभेस फार गर्दी झाली नाहीं तरी बाबू मंडळींचा आदरातिथ्या संबंधानें बातनेत वर्णन करण्या सारखा होता.

राष्ट्रीय सभेच्या अशल्या जंगी व दरबारी बैठका झाल्या नंतर या सालची बैठक त्यांच्या खालोखाल म्हटली तरी नागपुरच्या मानानें फार भव्य सभा होईल असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. आणि त्यांतून सभा भरविणें, लोक मताचा डंका गाजविणें, निरनिराळ्या प्रकरणीं आपापल्या हक्कांचें प्रतिपादन करणें, सरकारास आपल्या कर्तव्या संबंधानें जागृत करणें, मुनसिपालिटींच्या कामांत लोकांस एकत्र गोळा करून त्यांच्या मताभिमानी लोकांची निवड करणें इत्यादि गोष्टींत आणि अशाच अनेक प्रकारच्या चळवळींत मध्यप्रांत वऱ्हाडप्रांता समवेत फार मागसलेला आहे आणि तदनुरूप नागपुर शहराची व्यवस्था असल्या मुळें येत्याच्या सभेचें काम म्हणजे तेथील लोकांच्या अटकळी बाहेरचें आहे असें आम्ही मानतों. नागपुरकर मंडळीची मुख्यत्वें करून फार उत्साह शक्ति व देशाभिमान पाहून आम्हास विशेष आनंद वाटतो कीं त्यांनीं या जीवापाड कामांत यश मिळविण्याचा विडा उचलला आहे. या साठीं त्यांची प्रशंसा केल्यास काडीमात्र वावगी नसून लोकांनीं त्यांच्या प्रयत्नांचें प्रोत्साहन करून यथाशक्ति त्यास मदत देणें प्रत्येकाचें कर्तव्य आहे.

वरील कर्तव्या पैकीं मोठा भाग शेजार धर्मा प्रमाणें वऱ्हाडच्या मंडळीवर पडत आहे हें निराळें सांगणे नको. आपल्या कर्तव्यास स्मरून लोकांनीं या वेळीं आपली वाणी राखली पाहिजे. आम्हीं हा लेख फार लवकर हातीं घेतला आहे असें कित्येकांस वाटेल परंतु आमच्या मतें वऱ्हाडच्या लोकांना राष्ट्रीय सभे विषयीं सध्यां पासून जागे करणें वावगें होणार नाहीं. वऱ्हाडांतील आणि त्यांत विशेषें करून अकोला जिल्ह्यांतील लोकांनीं लोकनियुक्त संस्थेची उपयुक्तता जाहिर करून प्रतिनिधी निवडण्यांत फार उत्तम मार्ग घालून दिला आणि गतवर्षी ऐन भर उन्हाळ्यांत राष्ट्रीय सभेचें प्रांतिक निम्में काम पुरें करून सोडिलें होतें. या उत्तम व्यवस्थशीर पद्धती विषयीं सर्व महाराष्ट्रांत वऱ्हाडच्या लोकांची आख्या झाल्या बद्दल आम्हीं वेळोवेळ खुलासेवार लिहिलें आहे. वऱ्हाडांतूनच दोन गृहस्थ राजश्री जोशी व मुधोळकर राष्ट्रीय सभेच्या कामानिमित्त विलायतेस गेले होतें. इतर गोष्टींत आमचा प्रांत फार मागें पडलेला आहे तरी राष्ट्रीय सभेची कामगिरी बजावण्यांत वऱ्हाड प्रांताची पुष्कळ प्रांतावर वरचढ आहे हें कळविण्यास आम्हांस मोठा संतोष वाटतो. या नांवलौकिका प्रमाणें येत्या डिसेंबर महिन्यांत वऱ्हाडच्या मंडळी कडून प्रशंसनीय अशी व्यवस्था राष्ट्रीय सभेची नागपुरास झाली पाहिजे. नागपुरास सभा भरविण्याची योजना थोडी बहूत वऱ्हाडच्या सल्ला मसलतीनें झाली आहे. तेव्हां सर्वोपरीनें सभेचें काम निर्विघ्नपणें शेवटास जाई पर्यंत आमच्या प्रांतांतून मोठी कुमक झाली पाहिजे. पैशा अडचणी संबधानें ही आमच्या प्रांतिकमंडळीस चांगली घस सोसावी लागेल. वऱ्हाडांतून निदान सोळा हजार रुपये गोळा व्हावयाचे आहेत तेव्हां त्यांत स्वदेशसेवे प्रीत्यर्थ लोक आपापल्या थैल्या परोपरीनें अधीक सैल सोडण्यास माघार घेणार नाहींत अशी आह्मांस पूर्ण उमेद आहे. वर्गणी गोळा करण्यासाठीं यावेळे पासून तजवीज होणें अगत्याचें आहे तेव्हां आमची पुढारी मंडळी काय काय व्यवस्था करितात हें पाहण्याकडे आमचें लक्ष्य विशेष लागेल.

तशांत आनंदाची गोष्ट ही होय कीं नागपुरची सभा मागील सभा प्रमाणें फार मोठी होईल असा सुमार आहे बेंगाल नागपूर रेल्वे सुरू झाल्यामुळें बंगालच्या बाबू मंडळींस सभेस येण्याची उत्तम सोय झाली आहे. मध्यप्रांत ह्मणजे बहुतेक हिंदुस्थानचा मध्यभाग त्यांत मोडतो आणि नागपुर शहर अगदीं सर्व हिंदुस्थानाला बरोबर मध्यस्थानीं आहे तेव्हां यंदा प्रवास हो मागील प्रवासाच्या मानानें राष्ट्रीय सभेच्या सभासदांस व प्रेक्षकांस सौख्य व सुलभ पडेल ह्मणून पुष्कळजण या सभेला अगत्य पुर्वक येतील असें वाटतें. वरील रेलवे दिरोन दुसरें एक अती महत्वाचें साधन चालूं वर्षाच्या सभेस प्राप्त झालें आहे तें सरकारी नोकरास प्रेक्षक या नात्यानें सभेस जाण्याची सदर परवानगी होय. या सवलतीमुळें पुष्कळांचा राष्ट्रीय सभेस येण्याचा मनोद्दय पूर्ण होईल आणि त्या बद्दल सर्व श्रेय व्हाइसराय लार्ड लान्सडाऊन यांस आहे तेव्हां या तीन चार साधभूत गोष्टीमुळें नागपुरची येत्या सालची राष्ट्रीय सभा पूर्वी प्रमाणेंच टोलेजंग भरेल त्या अर्थीं त्या संबंधाची सर्व व्यवस्था फार कडेकोट रितीनें झाली पाहिजे म्हणून नागपूरच्या प्रमूख गृहस्थानीं कंबर बांधून आता पासून उद्योग आरंभिला आहे परंतु आमच्या प्रांताची हाल चाल नागपरकरांच्या तोलास तोलून येणारी अद्याप नाहीं एवढेंच कळविण्या पेक्षां विशेष तपशीलवार लिहिण्याचें सध्यां प्रयोजन दिसत नाहीं

संमति बिला संबंधानें भयंकर फाटाफूट झाली आहे तरी आमच्या मतें राष्ट्रीय सभेस कोणत्या ही पक्षाकडील समजूतदार लोकां कडून व्यत्यय किंवा अडथळे येण्याचा संभव नाहीं कांकीं संमति बिलासारख्या लोकमतास झुगारून देणाऱ्या कायद्याचा बीमोड करण्यास उत्तम साधन झटलें ह्मणजे आमच्या परधर्मी बहुभाग्य प्रजेस राष्ट्रीय सभे शिवाय दुसरा कांहीं एक उपाय उरला नाहीं. परंतु कायदेबाज मंडळींनीं प्रस्तुतच्या नाजूक प्रसंगीं लोकमताच्या जया साठीं आह्मी लढण्यास सिद्ध आहो अशी बहूत लोकांची खात्री करून दिली पाहिजे. मग या लोकमताच्या तत्वांशीं सामाजिक किंवा राजकीय उन्नतीचा संबंध पडला ह्मणजे मूळ सिद्धांतांत फरक होतो असें मात्र प्रतिपादण्याचें त्यांच्या हातीं राहणार नाहीं. या प्रकरणांत आम्हीं आपले अभिप्राय गेल्या दोन अंकीं स्पष्टपणें ध्वनित केले आहेत तेव्हां आमच्या म्हणण्यास विरोधी मतप्रदर्शन होण्या पूर्वीं हल्लीं अधीक लिहिणें नको.

---

“पंजाबमध्यें गुर्जीन यांचे प्रांतांत १८३७ पासून सारा वाढविला जात होता. सरते शेवटीं १८७७ सालीं तर कमालच झाली. पिकें गेलीं; तरी सरकारास अफगाणिस्थानांत लढाईला पैसा पाहिजे होता ह्मणून गुर्जीनचे लोकांनां पैसे द्यावे लागले. दोन वर्षें लोकांचे खाण्यापिण्या संबधानें हाल झाले; दुसऱ्या वर्षीं हिंवाळ्यांत पीक आलें, पण लोकांनां पीक काढण्या इतकी शक्ती नव्हती. याचा परिणाम असा झाला कीं सुमारें १/८

मनुष्यें ( ८००० ) नाहींशी झालीं, १५०,००० गुरें मेलीं व दोन लक्ष रुपये कर्ज झालें. सर जे. लायल व सर सी. यु. एचिसन यांनीं निष्काळजीपणाची वर्तणूक झाल्याविषयीं" ही हकीकत पायोनियर वरून घेतली आहे. सरकारी छपखान्यांतून लाहोर येथें छापिलेल्या एका बुकांत ही सर्व हकीकत सांपडेल. या संबंधानें पार्लमेंटांत मि. वर्ट यांनीं प्रश्न विचारले. सरजान गार्स्ट यांनीं यावर उत्तर देतांनां सर्व दोष एका कामगाराचे माथीं मारला. तो कामगार सध्या आपले मतीनें बोलण्यास जिवंत ही नाहीं. जे लायल व सी. यु. एचिसन यांचें संबंधानें सरजान गार्स्ट कांहीं एक ह्मणाले नाहींत. खरोखर पाहिलें असतां वरिष्ट कामगाराकडे दोष येतो. पायोनियर पत्रकर्त्याचे मतानें सरकारी अडचणीमुळें सारा कमी करता आला नाहीं. या सरकारी अडचणीचा परिणाम वर निर्दिष्ट केलाच आहे. यावेळीं लार्ड क्रिटन व सरजान स्ट्रॅची यांनीं ' लोकांना हाल मात्र सासावे लागतील परंतु त्यांच्या जीवाचें संरक्षण झालेंच पाहिजे' असें ह्मटलें होतें पण या ह्मणण्या प्रमाणें वागणूक मुळीच झाली नाहीं. अशाच प्रकारची स्थिति वायव्य प्रांत व अयोध्या या मधील कित्येक भागांची आहे.

---

# The Berar Samachar

**MONDAY, APRIL 27, 1891.**

It is very amusing to tell our reading public that Mr. C. E. Schwann M. P. gave a most touching as well as interesting address to the members of the Manchester Geographical Society on Thursday the 2nd April. It is now our intention to make room in our columns for at least the sum and substance of what he said at length on the occasion. The chief aim of the speaker was directed to carry home to the minds of the audience the firm and well-assured convictions he carried with him about the state of the natives of India. He came out here in our country with an ardent hope that he would see much that would satisfy both his eye and mind. His hopes did not belie him. He was much pleased with the places that he visited in his short and flying tour to India. He is very favourably disposed towards us. With a naturally good heart and sincere motives, he cannot but sympathise with--nay feel for,—the present deplorable state of the natives of India. He is moved because he actually feels the pulse of India. The natives of India are growing weaker and weaker in many more ways than one. Bright prospects are quite taken away from them for many centuries to come. Totally ignorant as the masses are in regard to their true interest and material welfare, they are hopelessly stumbling at every step and committing grave follies and glaring blunders. They have their own erroneous notions of things and they will stick to them to the last. Any the slightest attempt to enlarge their views by laying bare to them their follies, has a very disheartening effect. Why it is so is another question. Its solution may require a great amount of thought and information. The root and fibres of the present misery and degradation may lie deep and obscure. Patient labour, and excessive deligence and skill may fathom the depths and bring to light the original seeds the offshoots of which are ramifying throughout all the parts of our country. But we are spared, at present, all that elaborate process of deliberation and reasoning which is used up in unravelling the complex and intricate nature of the question in as much as our present intention is simply to pen within the shortest possible compass the vigorous and lively description which Mr. Schwann gave of India. He gave expression to what he saw and felt. The first thing that struck him most was the slow move that the natives are making in point of Education, and the enormously rapid rate at which our Parsee brethren are bettering their condition. As far as his information could be relied upon he could find to his great wonder, only two percent of the Hindu children at school. The percentage among the Parsees is exceedingly satisfactory. It is cent per cent. There is already a world-wide difference between the natives and the English. But the Parsees are now within a very short distance from the English. They are fastly improving and coming up to the level of the English. They have marvellously introduced many important changes in their modes of life and duty— that suit their interest and welfare. They are now leading figures in native communities and it is hoped they they will ever continue to be so. They have a good start because they are always ready to shake off what is old and unsuited to the present circumstances, and are ever in earnest to extract substantial good from every thing that they meet with. They begin with the Kinder garten system for infants and go on with secondary and higher education until the students are ripe enough to enter the University. With this, he dismisses the point of education.

He next turns his attention to impoverishing condition of the natives of upper India. There he saw many families demoralised and degraded in their tastes and habits by free use of opium among them. Opium-smoking was the vice of the vices and the incentive to licentiousness. It caused a deeper degradation of mind and body and was in many cases the immediate cause of madness and often of distortion of the limbs & countenance. Mr. Schwann is fully convinced that the belief that "opium is used to ward off fever and is most beneficial in its effects" is quite erroneous. Opium is on the contrary a curse and the destroyer of honor, health, wealth and happiness. He now takes a position where he can be most vehemently assailed by many of his critics. He draws the carping attention of his audience to a serious subject— a subject which should be well understood by the English people. He asserted in emphatic terms that the maladministration of justice in one respect did more than perhaps any thing else to irritate the Indian people against the British rule. That maladministration or miscarriage of justice came in only when the race-feeling of the Anglo-Indian portion of the community was called into play. Justice between Hindu and Hindu or between Hindu and Mussalman was administered impartially and no genuine complaints arose on that head. It was only when an Englishman was in the dock that English juries and judges (and he was sorry to say so) seemed to lose their heads. The public are already prepared to comprehend how English men could degenerate when living long with more or less uncivilised races and to understand why AngloIndian writers and gentle Anglo-Indian ladies could never talk of the execution of a native without saying that "another nigger had been polished off" nor of the execution of an Englishman when a conviction could be obtained against one which was not easy, however glaring the crime, without its being said in indignant terms, that "another Englishman was today strangled to death in public." With this he leaves the point of justice and enters upon the description of Ceylon. In Ceylon though the quantity of coffee produced, dwindled down every year the loss was made up for by the excessive increase of tea trade. During the last four years it had nearly quadrupled. He said much on that head in which few are interested at present. In concluding his address Mr. Schwann spoke of the gentle manners of the Hindus as a rule— and of their good temper and good behaviour, even when assembled in the streets in vast crowds, he could scarcely expect to convey any impression. Never was a nation more blessed with critics anxious to point out their mental, moral, and physical defects. The very subtlety of intelligence of the Bengalees was triumphantly quoted against them, and their moral nature was said to be stunted and distorted as their physical growth was declared to be puny and weak. Martial heroes fresh from the cricket fields of Eton, their thews and sinews built up on the roast beef of old England, had nothing but lofty scorn for the emaciated limbs of a *submissive peasantry fed upon rice or millet and daily exposed to the rays of the burning sun.* The shady habits of the native were dilated upon in every term of reproach and the embezzlement of a native bank—clerk was discanted upon with virtuous indignation by Anglo-Indians who conveniently forgot the Red paths and the collies and the secretaries of building and benefit societies who so often disappeared with funds which did not belong to them even in their immaculate country. He supposed that the Hindus were no more free from faults than any another nation and that oppression by the Moslem and climatic influences would tell their tale on character; but in every country there were infinite varieties of character and none could justly draw an indictment against a whole nation. If the Indian people needed guidance all the more it was incumbent on their fellow subjects to show sympathy for their weaknesses and ignorance. The real friends of India were those who, in the words of the biographer of Lord Lawrence "know the natives and sympathise with them and have learned to love them; who in the spirit of a truly imperial race look upon themselves as the *servants of those whom they rule,* who rule by serving them and do every thing that in them lies to bridge over the yawning gulf which by our fate or by our fault *still separates colour from colour, race from race, and creed from creed.* Till that gulf can be in some measure bridged over whatever our good intentions and whatever the benefits of our rule—and they are neither few nor small, we still, disguise it as we will, hold India by the sword— and so long as we hold it by the sword alone we hold it by the least satisfactory and the most precarious of tenures."

The concluding portion of Mr. Schwann's address is really worth remembering by every body--be he a native or an Englishman. Ardour and enthusiasm sincerity of heart and courage to speak the truth and the true sense of responsibility that makes the whole of his address are potent factors in the nature of Mr. Schwann-a man of high education. Strange to say such a statement coming from so great an authority serves as a corroborative evidence to what Mr Caine says on the administration of justice in India. Mr. Caine is an ex M. P. Mr. Schwann has at present a seat in Parliament. Mr. Caine is severely criticised by Anglo-Indian papers. We may grant that the criticism offered by the Anglo Indian dailies may be true and that Mr. Caine may be misinformed. Once this is allowed the same assumption shall have to be repeated in every case in which a member of Parliament supports Mr. Caine's views.

The fact seems to stand thus—whoever supports Mr. Caine's statements has his vision distorted by dust being thrown into his eyes. He sees things in colours different from those in which the Anglo Indian journals see. We mean to side with neither of the two. The only point that is clear that a plain speaking man makes many enemies.

---

## वऱ्हाड.

'प्रमोदसिंधू' वरून कळतें कीं फौजदारी खटल्यांत न्याय अधिक चांगल्या रितीनें देतां येण्या साठीं जुडिशिअल कमिशनर कर्नल मेकंजी यांनीं रा. रा. जोशी, बुधोळकर, खापर्डे, व जोग यांचा सल्ला विचार घेतला. कायदे पण्डित व अनुभविक लोकांचा बहुमानानें उपयोग करून घेण्याचा मशारनिल्हे साहेबांनीं उत्तम मार्ग काढिल्या या बद्दल आम्ही त्यांची स्तुती करितों. परंतु आमच्या मतें वऱ्हाड सार्वजनिक सभेचे अभिप्राय अशा महत्वाच्या प्रकरणांत विचारले असते म्हणजे त्या संस्थेस महत्व येऊन प्रांतातील इतर प्रबुद्ध व भिन्न भिन्न विचारांच्या लोकांचें मत एकवटीनें सरकारच्या नजरेस आलें असतें कारण त्या सार्वजनिक सभेत वरील गृहस्थ असून प्रांतातील बहुतेक प्रमुख गृहस्थांचा समावेश होतो. सेशन मोकद्दम्यांत असेसर्स असतात त्या ऐवजीं ज्युरर्स नेमण्याची पद्धत, स्पेशल माजिस्ट्रेट व बेंच माजिस्ट्रेट या विषयीं बऱ्या वाईट गोष्टी, पोलीस खात्यांतील सुधारणा व त्यांच्या कडील साक्षिच्या चौकशी इत्यादि पुष्कळ भानगडीच्या प्रकरणांत बाटाघाट व्हावयाची होती असें प्रमोदसिंधु कर्ते लिहितात.

फौजदारी अपराधांचे आरोपांत सांपडल्या मुळें बुलढाण्याचे फारेस्ट आफिसर मि. ब्रिटन बेकर यांस बरतर्फ केलें असून त्यांची चौकशी आज पासून मि. एच्. एस. निकोलेट यांच्या समोर चालणार आहे.

मि. निकोलेट डेपुटी कमिशनर यांची स्वारी तीन महिन्यांचे रजेवर जाणार आहे असें आह्मी ऐकितों

परवा रात्रौ मुंबईकर परांजपे संगीत मंडळीनें येथें पहिला खेळ रामराज्य वियोगाचा केला त्यांतील पहिले तीन अंक कै० किर्लोस्कर यांनीं रचिले असून त्या काव्याची कथानका संबंधानें परिपूर्ती वरील मंडळीनें एका चांगल्या कवी कडून करून घेतली आहे आणि या शेवटील दोन अंकांत तर नाटकास नामी रंग आला होता. प्रेक्षक पुष्कळ जमले होते आणि एकंदरीनें सर्व प्रयोग फार उत्कृष्ट झाला त्यांत मुख्यत्वेंकरून वसिष्ठ, राम, दशरथ, भरत, कैकयी, मंथरा, व शत्रुघ्न इत्यादि पात्रांचीं कामें उत्तम वठलीं. ही नाटककार मंडळी लोकांच्या उदार आश्रयास पात्र आहे असें कळविण्यास आह्मांस मोठा संतोष वाटतो. येत्या बुधवारीं हे लोक किर्लोस्करांच्या संगीत सौभद्राचा प्रयोग करून दाखविणार आहेत.

---

## वर्तमानसार.

आपल्या नायकांस पशू प्रमाणें वागविणें यांत तर विलायतच्या लोकांस मुळींच आश्चर्य वाटत नाहीं; तें त्यांच्या अगदीं आंगवळणीं पडलें आहे. पार्लमेंट मेंबरच्या विनंतीवरून प्रसिद्ध झालेल्या माहितीवरून ११ वर्षांच्या आंतील मुलीवर तिकडील लोक बळजोरी करतात हें सिद्ध झालें आहे. गर्भपात करणें हें तर विलायतच्या स्त्रीयांचें कर्तव्यकर्म होऊन राहिलें आहे. लहान लहान अर्भकांचें, त्यांच्या राक्षसी आयांवडून व दातऱ्यावडून, नित्य खून होतात असें "लंडन स्पेक्टेटरचें" ह्मणणें आहे; आणि अशा पोरांचें संरक्षण होण्यासाठीं एक सभा स्थापन व्हावी असें खुद्द पालमाल ग्यांझट ह्मणतें. ठा० अ०

अलीकडे हिंदुस्थान सरकारच्या कित्येक अन्यायप्रद कृत्यांवर हौस कामन्स सभेंत बरीच सणसणींत टीका होत आहे हें पाहून संतोष वाटतो. सी. डी. आक्ट ह्मणजे गोऱ्या सोल्जरांकरितां एतद्देशीय स्त्रिया पुरविणेचा कायदा मागें तावडतोब बंद केला गतवर्षी अबकारी संबंधानें हिंदुस्थान सरकारच्या कृतीस तिरस्कार दाखविला. आणि यंदा अफुच्या मक्त्या बद्दलही सरकारचा मोठा धिक्कार बहुमतानें कामन्स सभेंत व्यक्त केला. या गोष्टी खरोखर अभिनंदनीय होत. क० त०

मुंबई शहरांतील चालू असलेला पोलीस खर्च ९००० हजार रुपये व यापुढें पोलीस लोक वाढविणें असल्यामुळें त्यासाठीं होणारा दरमहा ६,०८२ रुपये आणखी दोन वर्षांनीं मुंबई म्युनिसिपालिटीवरच लादला जाईल अशा अर्थाचा सरकारी ठराव गेल्या ग्याझेटांत प्रसिद्ध झाला आहे. ठा. अ.

—मि दिनशा एदलजी वाच्छा यांनीं मुंबई म्युनिसिपालिटीचा खर्च उत्पन्नाच्या मानानें अतिशय झपाट्यानें वाढत चालला आहे त्याच्या प्रतिबंधार्थ कांहीं उपाय योजावा अशा बद्दल कार्पोरेशन मध्यें सूचना केली होती; परंतु ती बहुमतानें नापसंत झाली. इतर शहरच्या म्युनिसिपालिट्यांस ही आपल्या जमाखर्चाच्या तालेबंदी वरून आयापेक्षां व्यय जास्त न होऊं देण्या विषयीं कसोशीनें खटपट केली पाहिजे. सु. प.

स्त्रीवेष धारी मुलगा — पारीस शहरांत म्याडम डुबासल या नांवाचे एका बाईला मूल पाजण्या करितां कांहीं आठवड्या पूर्वी एक दाई पाहिजे होती. नंतर तिनें ऑगस्टाइन लेरीज या नांवाची एक बांधेसूत, दिसण्यांत सुरेख व उंच अशी बाई दाईच्या कामावर ठेविली. ती आपलें कामही बरेच दिवस बिनबोभाट व चोखीनें करीत असे. पुढें एका दिवशीं त्या घरवाल्यांची अनेज नांवाची एक सुरेख व ठसकेबाज कुळंबीण तिच्या जवळ येऊन सांगूं लागली, मी भांडीं घासण्याचें गडबडींत असतांना आपली आगस्टाइन दाई माझ्या फिदा झाली, व माझ्यापाशीं लग्न करण्या विषयीं विनंति करूं लागली. तिनें आपलें खरें स्वरूप माझ्यापुढें प्रगट केलें. व हा स्त्रीवेष घेण्याचें कारण हा सांगितलें. ती स्त्रीविषधारी मुलगा आहे हे तिचे शब्द म्याडम ड्युबासल ऐकून चकीत झाली. तिनें आगस्टाईन दाईला पुढें आणून खरी खरी हकीकत विचारिली दाईनें सांगितलें कीं मी पुरुष आहे मी आजपर्यंत कामधंदे केले आहेत. मी शिक्षित आहे प्रथम मी एका शाळेंत शिपायाची नोकरी धरिली, तेथें न मिळे ह्मणून एका कारखान्यांत चित्रें रंगविण्याचें काम करूं लागलों तोही धंदा पटेना ह्मणून एका गाड्यांच्या कारखान्यात शिरलों व तेथेंही जुळेना; ह्मणून स्त्री वेषधारण करून हा दाईचा धंदा पत्करला. व तुमच्या सुरेख कुणबीणीनें माझी काम वासना अनावर केल्यामुळें माझी सर्व खटपट उघडकीस आली या दाईला वेषपालटण्याचे अपराधावर मजिस्ट्रेटपुढें उभें केलें होतें; परंतु माजिस्ट्रेटानें ताकीद देऊन तिला सोडून दिलें.

अमेरिकेत एका मनुष्यानें उसाचें बी शोधून काढिलें आहे. त्याच्या योगानें आपणास दरवर्षी ऊस कापून लावावा लागतो तसा न लागतो तें बी रुजत घातलें ह्मणजे उत्तम ऊंस तयार होतो. स० शो०

रशियन राजकुमारानें हिंदुस्थानात फिरत असल्याचा मजकूर त्यानें जी नोंद आपल्या रोजनिशीत वेळो वेळीं करून ठेविली त्याच्या आधार आपल्यास वडीलास पत्रद्वारा कांहीं गोष्टी कळविल्या त्यांतील शिल्लक भाग येणें प्रमाणें.

इकडचे कांहीं ग्रंथकार ह्मणतात कीं देशरूढी प्रमाणें रयत वागविण्यांत जितकी थोरवी तितकी २९ कोट प्रजा माझ्या ताब्यांत आहे असें ह्मणण्यांत अर्थ नाहीं.

हिंदुस्थानांत राज्य कारभार चालविण्या साठीं इंग्लडची मंडळी येतात; ते लोक सर्वच नीति शास्त्रा प्रमाणें वर्तन राखतात असें माझ्यानें ह्मणवत नाहीं, कारण बरीच उदाहरणें लांबलाऊ दुर्व्यसनी माझ्या पहाण्यांत आलीं.

इंग्लिश सोलजर शिपायांचा त्रास प्रत्येक जिल्ह्यांत माझ्या कानावर आला.

इकडील कायदे कौन्सलांत सरकार आपल्या मतानें मेंबर निवडून घेऊन नेमणूक करते.

इकडे न्याशनल कान्ग्रेस ह्मणून दरवर्षास एक मोठा मेळा भरत असतो; त्या लोकांचा हेतु तरी फंद फितूर कांहीं एक करायाचा नसून सरकारानें आह्मांस वाजवी हक्क देऊन इंग्लंडच्या प्रजे प्रमाणें वर्तवावें इतकेंच त्यांचें ह्मणणें आहे.

राष्ट्रीय सभा राज्यद्रोहाच्या फासांत अडकवितां येईल कीं नाहीं अशा प्रकारचा प्रश्न पुष्कळ लोकांनीं मज पुढें ठेविला; त्याचें उत्तर मी तिकडून पाठविलें तरी चालणार आहे.

येथें दुसरा असा एक चमत्कार दृष्टीस पडला तो हा कीं, युरोपिन जातीनें खून केला आणि जवळ हिंदू माजिस्ट्रेट फर्स्ट क्लास असला तरी त्याला चौकशी करण्याचा अधिकार नसून ती चौकशी युरोपियनच माजिस्ट्रेटास आणवून करावी लागते परंतु फांशी देण्याच्या वेळीं हिंदुस्थानांतले मांग युरोपियनास फाशी चढवितात हें फार वाईट आहे.

हिंदुस्थानांतील बहुतेक ठिकाणची जमीन मोजणी झाली आहे; परंतु ती पुरी भरवंसेशीर नसल्याचा बोभाटा माझ्या कानीं आला.

चुका नाहींत असें एक खातें मिळणार नाहीं परंतु वर्तमानपत्रांत त्याउलट मजकूर नच आला पाहिजे असा बंदोबस्त आहे.

लार्ड रिपन गव्हरनर जनरल यांनीं हिंदुस्थानांतील लोकांवर जशी प्रेमाची छाया पाडली तशी छाया पाडणारे राजकुशल अधिकारी इकडे फार थोडे आले.

हिंदूच्या ताब्यांतून हिंदुस्थान घेतलें ह्मणून इंग्लशांना मुसलमानांशी तह वगैरे करण्याचें कारण पडलें नाहीं, शहाजानानंतर सर्व मुसलमानी अधिकार हिंदूकडे आला, त्यानीं दिलीच्या दरवाज्यावर आपल्या भगव्या झेंड्याचें टोंक टेकून ठेवलें होतें.

पंजाबमध्यें शीख लोकांची कारकीर्द बरीच गाजली होती; परंतु हिंदूच्या पराक्रमानें मोडावून हिंदूच त्या देशाचे मुखत्यार बनले आणि अखेरीस इंग्रजांनीं सर्व घेतलें.

इकडे गोरे लोक फार तोऱ्यानें राहतात ते हिंदुस्थानांतील लोकांची पर्वा राखून चालत नाहींत. दहा हजार लोकवस्तींत एकटा युरोपियन निर्भयपणें झोंप घेऊन सर्व प्रजा गाढवासारखी पिटाळतो.

इकडील बहुतेक ठिकाणचीं जनावरें हाडें निघालेलीं दृष्टीस पडतात कारण गांवाभोंवतीं त्यांस स्वैर पणानें फिरण्यास जागा नाहीं.

जनावरांस स्वतंत्रपणानें तोंड फिरवून त्यांच्या दुधास शुद्ध करणाऱ्या वनस्पती मिळत नसल्यामुळें इकडील दुधांतला आरोग्यपणा कमी झाला.

केव्हां केव्हां मजकरितां च्याहा तयार होऊन येई तेव्हां तेव्हां मी पाहिलें आहे कीं त्यांत घातलेल्या दुधास मुळींच चिकणाई नसे.

चिकणाई ही मनुष्याच्या आरोग्यास अधिक पोषक असल्याचें मज डाक्टर सांगत ह्मणून तसला च्याहा जमिनीवर फेकून देण्याचा वक्त येई. फेकलेल्या ठिकाणीं च्याहांतील ओषटपणा मुळींच आढळून येत नसे. तो पाण्यासारखा जमिनींत जिरून जाई. चांगलें दूध जमिनीवर टाकलें तर जिरत नाहीं.

लहानपणीं लग्नापासून प्रजा अशक्त होते, तसेंच लहानपणीं स्त्रीसुखानुभव हिंदू घेतात सबब ती प्रजा अशक्त होते असें बळण दाखविण्या पेक्षां हिंदू निःसत्व अन्नामुळें अशक्त होत चालले, या सिद्धांतच्या रस्त्यानें जाते तर अधिक फायदा करून घेते.

गायरानें बंद पडल्यामुळें शेतास चांगल्या खताचा भराव मिळत नाहीं हें एक निसत्व अन्न तयार होण्यास मोठें कारण माझ्या दृष्टीस पडलें.

शेतकरी लोक अतिशय श्रमी आहेत त्यांस धान्याची पेरणी, लावणी, काढणी चांगली करता येते, परंतु शेतपाहणी करून उत्पन्नाच्या मानानें सारा घेत नसल्यामुळें लोक सुखी नाहींत. महाराष्ट्र मित्र


## सचित्रकचाटलाग.



आर. डी. कानिटकर आणि कंपनी मुंबई गिरगांव ह्याचा नवीन तऱ्हेचा इंग्रजी किंवा मराठी अर्ध्या आण्याचें तिकिट पाठविल्यास मिळेल.



वामन गोपाळ यांचा अनेक औषध मिश्रित

## सार्सापरिला

हा सार्सापरिला अनेक रोगांवर गुणावह असून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणाकारी आहे. उपदंशजन्य विकार, (गरमी) व तिजपासून होणारे पक्षघातादि भयंकर रोग, संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हाता पायांच्या तळव्यांवर व सर्व शरिरावर काळे डाग पडणें. संधी दुखणें कळा लागणें, सुज येणें वगैरे सर्व संबंधित वायुंवर तसेंच कोणत्याही प्रकारचे त्वचेचे रोग, जसें सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज, गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांचे, मस्तकाची व हातापायांची आग होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे. सारांश उपदंशजन्यापासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दूषित झाले असल्यास ते शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखे दुसरे औषधच नाहीं. दर बाटलीस किंमत १। रुपया, पोस्टेज ४ आणे; उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक धातु व रक्तवर्धक मिश्र फास्फरसाच्या

## गोळ्या

यापासून अतिशय विषयोपभोग, नित्य धातुस्राव यानें झालेली शरिराची क्षिणता जाऊन अशक्तता, अग्निमांद्य, जीर्णज्वर, नसकत्व इत्यादि विकार तावडतोब नाहींसें होतात. ह्यानें सर्व शरिरांतील चैतन्याचा व वृद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जाकेंद्र (मेंदू)व मज्जातंतु यांच्या मंद झालेल्या सर्व क्रियांचें पुनःरुज्जीवन होतें. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायुची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणास जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यानें पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत. किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे. बंगी व पोस्ट मिळून एकापासून कितीही बाटल्या घेतल्या तरी ६ आणे पडतील.

पांढरे केस काळे भोर होण्याचा

## कलप

हा कलप प्रत्येक पंधरा दिवसांनीं एक वेळ लाविला ह्मणजे पुरे आहे. यानें सफेद करड्या व पिंगट रंगाचे केस काळेभोर होऊन त्यास तेज येते. किंमत १ रुपया पोस्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधासीबत मिळेल पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्ही. छत्रे याचे दवाखान्यांत वरील सर्व औषधे मिळतील.

आमचा पत्ता—नव्या ठाकुरद्वारा समोर


☞ हें पत्र अकोला येथें के० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव यांनीं छापून प्रसिद्ध केलें.